मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज
दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २७९ ■ सोमवार, २२ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई :** जीवनशैलीमध्ये झालेल्या बदलांमुळे सध्या आजारांचे प्रमाण वाढले आहे. या आजारांना दूर ठेवण्यासाठी योग हा रामबाण उपाय आहे. त्यामुळे नियमित योग करून जीवनशैलीविषयक आजारांना दूर ठेवले पाहिजे, अशा शब्दांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी योगाचे महत्त्व अधोरेखित केले.






जुहू बीचवरील फूड कोर्ट जवळ आयोजित १२ व्या जागतिक योग दिनाच्या कार्यक्रमानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, खासदार रवींद्र वायकर, आमदार अमित साटम, शिवप्रकाश, केशव उपाध्ये, पवन त्रिपाठी, दीप्ती वायकर, उषा बेन आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सातत्याने योग करणारा व्यक्ती हा कुठल्याही मानसिक परिस्थितीमध्ये असली तरी आलेल्या आव्हानांचा यशस्वीपणे सामना करू शकतो. त्यामुळे योग विद्येचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे. नियमितपणे योग करून आपण आपले शरीर निरोगी व मन प्रसन्न ठेवूया, असे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

जगभरात 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्याचा प्रस्ताव संयुक्त राष्ट्र संघामध्ये भारताने मांडला. संयुक्त राष्ट्र संघाच्या इतिहासात सर्वात कमी कालावधीत आणि कुठलाही विरोध न होता मंजूर झालेला हा प्रस्ताव आहे. भारताने दिलेल्या प्रस्तावानुसार आज जगभरात योग होत आहेत. शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगाचे महत्त्व जगाला पटले आहे. विश्वामध्ये योग विद्या आणि योग चिकित्सेबदल मोठे कुतूहल निर्माण झाले असल्याचेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

व्यक्ती ही केवळ शरीर नसून मन आणि आत्मा सुद्धा असल्याचे अधोरेखित करीत मुख्यमंत्री म्हणाले, माणसाचे मन निसर्गाशी जुळलेले आहे. त्यामुळेच योग विद्येमध्ये केवळ शरीराचा विचार न करता मन, आत्मा आणि शरीर या तिन्हींचा विचार करण्यात आलेला आहे. योग विद्येमध्ये मनाचा निसर्गातील तत्वांशी असलेला संबंध हा पुनर्जीवित करण्यात येतो. सातत्यपूर्ण योग केल्याचा परिणाम शरीरावर तर होतोच पण मानसिकदृष्ट्या सक्षम होण्यावरही होतो.

कार्यक्रम प्रसंगी शिवप्रकाश यांनीही आपले विचार मांडले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विविध योगासने केली. कार्यक्रमाला योगशिक्षक, योग करणारे नागरिक उपस्थित होते.

## डॉ . नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनच्या विशेष शाळेत जागतिक युनिफाईड योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : स्पेशल ऑलिम्पिक भारत महाराष्ट्र तसेच आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या पत्राच्या अनुषंगाने डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांच्या विशेष शाळेत 'जागतिक युनिफाईड योग दिन' (World Unified Yoga Day) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात विशेष शाळेतील विद्यार्थ्यांसह के.एल.ई. महाविद्यालय, कामोठे-पनवेल येथील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमादरम्यान श्री. सुरेश जाधव यांनी 'इन्स्टिट्यूट ऑफ योग अँड आयुर्वेद' तसेच 'आरोग्य सेवा समिती, पनवेल' यांच्या विविध उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली.

योग प्रशिक्षक सौ. नयना म्हात्रे आणि सौ. मनीषा म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थितांना विविध योगासने आणि प्राणायामाचे प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका सौ. श्रेया नंदकुमार जाधव यांनी 'जागतिक युनिफाईड योग दिन' याचे महत्त्व विशद केले. तसेच शारीरिक शिक्षण शिक्षक श्री. कांतीलाल पाटील यांनी विद्यार्थ्यांसोबत योग सत्राचे प्रभावी संचालन केले.

योगाच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ ठेवण्याचा संदेश देणारा हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला. उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक करत अशा उपक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## इंजि.रूपचंद रामटेके राज्यस्तरीय समाजसेवा पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा** - येथील रहिवासी इंजिनीयर रूपचंद रामटेके यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, नृत्यांगना,कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात ,त्यांच्या कार्याला गती मिळावी, व त्यांना सन्मान मिळावा उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात इंजिनीयर रूपचंद रामटेके यांच्या सामाजिक, शैक्षणिक, व फुले ,शाहू ,आंबेडकर चळवळ, सामाजिक कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पत्रकारिता सन्मान पुरस्कार बद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

## उष्णतेच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची अंमलबजावणी

### श्रीवर्धन तालुक्यात शाळा सकाळच्या सत्रात सुरू

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी:- अनिकेत मोहित** : रायगड जिल्ह्यात वाढलेल्या उष्ण आणि दमट हवामानाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार श्रीवर्धन तालुक्यातील अंगणवाड्या तसेच प्राथमिक आणि माध्यमिक शाळा आता सकाळच्या सत्रात भरू लागल्या आहेत.




गेल्या काही दिवसांपासून कोकण किनारपट्टी भागात उन्हाचा कडाका आणि दमट वातावरण जाणवत आहे. विशेषतः दुपारच्या वेळेत तापमानाचा त्रास वाढत असल्याने शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांना उष्णतेचा त्रास होऊ नये, यासाठी जिल्हा प्रशासनाने शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.

या आदेशानुसार श्रीवर्धन तालुक्यातील शाळा सकाळच्या सत्रात सुरू करण्यात आल्या असून, हा बदल ३० जूनपर्यंत लागू राहणार आहे. त्यानंतर हवामानाची परिस्थिती आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून पुढील निर्णय घेण्यात येणार आहे.

बदललेल्या वेळेच्या पहिल्याच दिवशी शाळांमध्ये विद्यार्थ्यांची चांगली उपस्थिती दिसून आली. सकाळच्या आल्हाददायक वातावरणात विद्यार्थ्यांचा सहभाग वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.

शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, उन्हापासून संरक्षणासाठी आवश्यक सूचना तसेच आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे.

दरम्यान, जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयाचे विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

उष्णतेच्या काळात विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देत घेतलेला हा निर्णय योग्य असल्याची भावना पालकांनी व्यक्त केली आहे.

## पनवेलला वैभव लाभायचे असेल तर अतिक्रमण पूर्व दक्षता कमिटी स्थापन करावी : शिवसेना सल्लागार रमेश गुडेकर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** पनवेल महानगर पालिका हद्दीत अतिक्रमण तोडण्यापेक्षा 'होऊ न देणे' या कायदेपध्दतीची प्रभावी अंमलबजावणी करावी. यासाठी ज्या प्रभागात अतिक्रमण करण्यात येत आहेत. त्या प्रभागातील नगरसेवकांना जबाबदार धरण्यात येऊन त्यांचे कायद्याने नगरसेवक पद रद्द करण्यात यावे अशी कळकळीची आणि खळबळ उडवून देणारी मागणी नगरपरिषदेचे माजी नगरसेवक पक्ष प्रतोद, शिवसेना ( शिंदे) रायगड जिल्हा कार्यकारणी सल्लागार रमेश गुडेकर यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे व महापौर नितीन पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाने केली आहे.




या निवेदनात रमेश गुडेकर यांनी म्हटले आहे की, पनवेल शहराचा विस्तार होतोय, रस्ते रूंद होत आहेत, हे विकास होत आहे. हे पनवेलला लाभत असलेल्या वैभवाचे लक्षण आहे. पण या विकासाच्या प्रकियेत एक अत्यंत विदारक दृश्य नेहमी पाहायला मिळते, ते म्हणजे 'अतिक्रमण हटाव मोहीम' जेसीबीचा पंजा जेव्हा एखादया कच्च्या घरावर किंवा पत्र्याच्या खोक्यावर पडतो, तेव्हा फक्त दगड-विटा पडत नाही. तर त्यासोबत एका सामान्य माणसांचा संसार आणि त्याची स्वप्नेही उध्वस्त होतात ही प्रशासनाला उशिरा येणारी जाग असे म्हटले तरी अतिशियोक्ती होणार नाही. आज पनवेलच्या नागरीकांच्या मनात एक साधा पण मूलभूत प्रश्न आहे, अतिक्रमण होईपर्यंत प्रशासन काय करत असते? एखादे घर किंवा दुकान एका दिवसात उभे राहत नाही. जेव्हा त्याचा पाया भरला जातो, त्याच्या भिंती उभ्या राहतात. आणि मग त्यावर पत्रा टाकला जातो, तेव्हा मनपाचे अधिकारी आणि कर्मचारी कुठे असतात? याबाबत आर्थिक व्यवहार करून अतिक्रमण करण्यास प्रोत्साहन देत आहेत असा आरोप पनवेल करत करत आहेत. अतिक्रमण पूर्ण होईपर्यत दुर्लक्ष करायचे आणि नंतर तकार आली की लवाजमा घेवून ते पाडायला जायचे, हा कुठला न्याय? तोडताना होणारे नुकसान हे केवळ आर्थीक नसते, तर ते भावनिक असते, त्या घराशी जोडलेल्या ऋणानुबंधासी असते. त्या घराच्या छताखाली वृध्द आई वडीलांच्या आरोग्याची स्वप्ने असतात, मुलांच्या शिक्षणाची जिद्द असते आणि पत्नीने काटकसरीने जमवलेला एक-एक रूपया असतो. तो पैसा संसार उध्वस्त होण्यापूर्वी त्याला रस्त्यावर आणण्यापूर्वी त्याला कायद्याचा धाक दाखविणे महानगरपा आयुक्त हे अतिशय जरूरी आहे. अतिक्रमणे सुरू होताच त्यावर वेळीच कारवाई होणे महत्वाचे व गरजेचे आहे. त्यासाठी समितीची स्थापना करणे ही काळाची गरज वाटते. महागाईने होरपळणाऱ्या आजच्या काळात सामान्य माणसाला दोन वेळच्या जेवणाची भ्रांत आहे. अशा वेळी त्याचे हक्काचे घर किंवा उदरनिर्वाहाचे साधन हिरावले जाणे हे अत्यंत क्लेशदायक आहे, म्हणून मनपाचे केवळ 'अतिक्रमण विभाग' न ठेवता' अतिक्रमण पूर्व दक्षता समिती' स्थापन करायला हवी आणि त्यामध्ये त्याच प्रभागातील नगरसेवकांची नियुक्ती करावीआणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी यातूनच पनवेलकरांच्या लोकहिताचे कार्य होईल असा आत्मविश्वास रमेश गुडेकर यांनी व्यक्त केला. या समितीचे काम शहराच्या प्रत्येक कोपऱ्यावर नजर ठेवणे असेल. जिथे अतिक्रमण सुरू होत आहे, तिथेच सुरूवातीला प्रतिबंध घालावा., गरीबांना उघड्यावर आणू नका. ज्यांना हॉकर्स झोन मध्ये जागा देणे हक्काचे आहे. त्यांना व्यवसायासाठी हक्काची जागा (हॉकर्स झोन) उपलब्ध करून दयावी असे नेत्यांना आणि लोकप्रतिनिधींना आवाहन त्यांनी केले आहे. पालिकेचे महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते, विरोधी पक्ष नेता आणि सर्व सन्माननीय नगरसेवक हे जनतेचे प्रतिनिधी आहेत. तुम्ही शहराचे पालक आहात. शहरात शिस्त हवीच, पण ती शिस्त गरीबांचे संसार उद्धस्त करून नको, अतिक्रमण 'काढण्यापेक्षा' ते 'होऊ न देणे' यावर प्रशासनाची कसब आणी कार्यपध्दती अवलंबून आहे. जेव्हा एखादे अतिक्रमण काढले जाते, तेव्हा त्या कुटूंबाचे भविष्य अंधारात जाते. मनपाच्या विकासात सामान्य माणसाचा 'बळी' न घेता, त्याला 'शिस्तबध्द पर्याय' देण्याचा विचार आपण गांभीर्याने कराल हीच माफक अपेक्षा. ती आपल्याला करता येईल आणि यातुनच पनवेलला वैभव लाभेल ! सदरचा पनवेलकरांच्या जिव्हाळयाचा विषय आपण विशेष सभा घेवून त्यावर योग्य ती चर्चा घडवून नागरीकांच्या फायदयाचा विचार करावा अशी विनंती नगरपरिषदेचे माजी पक्ष प्रतोद शिवसेना (शिंदे ) रायगड जिल्हा कार्यकारणी सल्लागार रमेश गुडेकर यांनी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त मंगेश चितळे आणि पालिकेचे महापौर नितीन पाटील यांच्याकडे लेखी निवेदनाने केली आहे.

# प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्वाच्या जोरावर नावलौकिक मिळवणाऱ्या व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्थान – आ. सुरेश धस

## आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे कार्य कौतुकास्पद – महापौर ज्योती गाडे


















**दैनिक युवक आधार**

**आष्टी | प्रतिनिधी** : विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सत्कारमूर्तींच्या कार्याचा आदर्श समाजाने घ्यावा, असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी केले. ते आष्टी तालुका युवा पत्रकार संघाच्या वतीने अहिल्यानगर येथे मेघनंद हॉटेल मध्ये दि २० जून रोजी आयोजित 'महाराष्ट्र आयकॉन्स' पुरस्कार सोहळयात ते अध्यक्षस्थानी भाषणात बोलत होते. पुढे बोलताना आ धस यांनी सांगितले की, प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्वाच्या जोरावर नावलौकिक मिळवणाऱ्या व्यक्ती समाजासाठी प्रेरणास्थान ठरतात. त्यांच्या कार्यातून तरुणांनी प्रेरणा घेऊन आपल्या जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवत कार्य करणे आवश्यक आहे. आजच्या धावपळीच्या युगात वेळेचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले असून, प्रत्येकाने आपल्या कार्यात वेळेचे बंधन पाळणे गरजेचे आहे. "आज कोणालाही कोणासाठी थांबायला वेळ नाही," असेही त्यांनी नमूद केले. तर आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने गेल्या सात वर्षांपासून सातत्याने नारी सन्मान व आज महाराष्ट्र आयकॉन्स पुरस्कार विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तुत्वानचा गौरव केला हे युवा पत्रकार संघाचे मोठे कार्य आहे असे त्यांनी सांगितले. आष्टी तालुका युवा पत्रकार संघाने राज्यस्तरीय स्तरावर विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींना एकत्र आणून त्यांचा सन्मान करण्याचा घेतलेला उपक्रम अत्यंत स्तुत्य असून समाजाला दिशा देणारा आहे, असे गौरवोद्गार अहिल्यानगर शहराच्या महापौर ज्योती गाडे यांनी व्यक्त केले. या पुरस्कार सोहळयामुळे समाजातील गुणी व्यक्तींना योग्य व्यासपीठ मिळत असून त्यांच्या कार्याला प्रोत्साहन मिळत आहे, असे ही त्यांनी नमूद केले. यावेळी डॉ सुधा कांकरिया,हभप महंत काशिनाथ महाराज शास्त्री, शिवसेनेच्या महिला जिल्हाध्यक्षा ॲड स्वाती जाधव, नगरसेवक सुरेश बनसोडे, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष गणेश मोकाशे,बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष लालाभाऊ कुमकर,हभप अशोक भोसले,हभप समाधान महाराज, संपादक राजेंद्र होळकर,जेष्ठ पत्रकार सिताराम पोकळे, उत्तम बोडखे, सुर्यकांत वडकर, संदिप खरमाळे आदी मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार वितरण सोहळा यशस्वी करण्यासाठी या कार्यक्रमाचे प्रमुख संयोजक आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, उपाध्यक्ष जावेद पठाण, सचिव गहिनीनाथ पाचबैल, समीर शेख,सोपान पगारे, अतुल जवणे, प्रेम पवळ, निसार शेख, राजेंद्र लाड, अमोल जगताप, मारुती सत्रे, अतुल जाधव, किरण शिनगिरे, ओंकार कदम, अशोक कुताळ आदी पत्रकार यांनी परिश्रम घेतले.तर प्रास्ताविक अध्यक्ष अविनाश कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन समीर शेख यांनी मानले."आष्टी तालुका युवा पत्रकार संघ नेहमीच समाजोपयोगी उपक्रम राबवतात. त्यांचे समाजासाठीचे योगदान अतुलनीय आहे.

### पत्रकारितेबरोबरच समाजसेवेचा वसा जपणारा युवा पत्रकार संघ – हभप महंत काशिनाथ महाराज

हभप महंत काशिनाथ महाराज शास्त्री बोलताना म्हणाले की,आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे सामाजिक कार्य इतरांनी अनुकरण करण्यासारखे आहे. इतर पत्रकारांनीही अशा प्रकारचे कार्य करावे. पत्रकारितेबरोबरच समाजसेवेचा वसा जपणाऱ्या या संघाचा सर्व स्तरातून गौरव करण्यात आला.

### या मान्यवराचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान

ह.भ.प. महंत काशीनाथ महाराज शास्त्री — अध्यात्मिक,ह.भ.प. समाधान महाराज नाडकर — अध्यात्मिक, सौ. सुशिला पवळ व श्री. रमेश पवळ — आदर्श पालक (माता पिता),सय्यद चाऊस — आदर्श कुस्तीपट्टू (महाराष्ट्र केसरी), डॉ. मुकुंद विधाते —आदर्श डॉक्टर, डॉ. संदीप गाडे — आदर्श डॉक्टर, डॉ. महेश नाथ — आदर्श दंतवैद्य, समाजसेवक, नवउद्योजक बद्रीनाथ जगताप — आदर्श प्रगतशील शेतकरी,परिवंत गायकवाड — आदर्श समाजसेवक,श्री. अमोलक जैन प्रसारक मंडळ — आदर्श शैक्षणिक संस्था, सागर आमले — आदर्श सरपंच, गोरख तरटे — आदर्श कृषी अधिकारी, संतोष दाणी — आदर्श मुख्याध्यापक व समाजसेवक बाळासाहेब भुकन — आदर्श गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर, भारती (सावित्री) अनिल शेवते — आदर्श मानद वन्यजीव रक्षक, श्रीमती सुषमा प्रकाश राठोड — आदर्श उद्योजिका, भरत गळगटे — आदर्श प्रगतशील पशुपालन शेतकरी, अशोक सुदाम मुटकुळे — आदर्श युवा उद्योजक,श्री. बाळासाहेब बोडखे — उत्कृष्ट बांधकाम व्यवसायिक,अनिल आंधळे — आदर्श चार्टर्ड अकाउंटंट, प्रवीण वारे — आदर्श युवा उद्योजक,ॲड. श्री. रत्नदिप निकाळजे — आदर्श विधिज्ञ, संदीप शिंदे — आदर्श पशुवैद्यकीय अधिकारी, अवित घोलप — आदर्श बांधकाम इंजिनिअर,अशोक कोरडे — आदर्श प्राध्यापक, प्रेमकुमार तावरे — आदर्श मेडिकल युवा उद्योजक, बाबासाहेब पवार — आदर्श समाजसेवक शिक्षक नेता, सुखदेव पोकळे — दिव्यांग व अनाथालय पीडीतग्रस्त आदर्श संस्था चालक, विजय मेहेर — आदर्श सोने-चांदी उद्योजक, सुभाष चौरे — आदर्श पत्रकारिता,सूर्यकांत नेटके — आदर्श पत्रकारिता, संतोष आमले — आदर्श संपादक, अजय कापरे — आदर्श समाजसेवक / उद्योजक, योगेश दाणी — आदर्श रुग्ण समाजसेवक, रवी सातसाई — आदर्श प्राध्यापक, सुधाकर राठोड — आदर्श मुख्याध्यापक,ॲड. श्री. विकास आजबे — आदर्श युवा विधिज्ञ, भगवान शिनगिरे — आदर्श समाजसेवक, विश्वनाथ राजाभाऊ खेंगरे — आदर्श ग्रामसेवक, शिवराज संजय सोले — उत्कृष्ट सेपाकटकरॉ राष्ट्रीय खेळाडू,शहाजी कोकणे — आदर्श प्रगतशील शेतकरी, अतिक शेख — आदर्श एल.आय.सी. सल्लागार बबन शिंदे — आदर्श समाजसेवक, मोहसिन पठाण — आदर्श वाहन विमा सल्लागार, तुषार दिलीप नाथ — उत्कृष्ट इंटेरियर डिझायनरसंजय तुपे — आदर्श संगीत अलंकार,प्रीता प्रमोद नागरे — आदर्श बालकलाकार,राणी दरंदले — आदर्श निवेदिका,शहादेव पालवे — आदर्श पोलीस अधिकारी,डॉ. विष्णु साबळे — आदर्श पशुधन विकास अधिकारी,भाऊसाहेब विठ्ठल खाडे — आदर्श युवा उद्योजक,ह.भ.प. अशोक महाराज भोळे — आदर्श वारकरी भूषण या मान्यवरांचा झाला सन्मान

# बांधकामाचे काम करीत असताना मजूराचा मृत्यू



**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : बांधकामाचे काम करत असताना एका मजूराचा चक्कर येवून त्याचा प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे येथे आकस्मिक मृत्यू झाल्याची घटना घडली असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

पनवेल तालुक्यातील वावंजे परिसरात बांधकामाचे काम करीत असताना एका अनोळखी इसम ज्याची उंची 5 फुट, रंग गोरा, अंगात निळ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट, चॉकलेटी रंगाची काम्रो हाफ पॅन्ट, दाढी केस वाढलेले अशा इसमाला चक्कर येवून त्याचा प्राथमिक आरोग्य केंद्र वावंजे येथे आकस्मिक मृत्यू झाला आहे. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे किंवा सहा.पो.नि.सुभाष डिगे यांच्याशी संपर्क साधावा.

# शतकवीर व्हायचे असेल तर आहार, विहार आणि व्यायामाची कास धरा – माजी आ. भीमराव धोंडे

## आष्टी येथील भगवान महाविद्यालयात जागतिक योग दिन उत्साहात साजरा; योगगुरू प्रा.भा.दे. जगताप यांचे मार्गदर

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे** : आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनशैलीत निरोगी राहणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. जर तुम्हांला शंघाई गाठायची असेल,म्हणजेच जीवनाचे 'शतकवीर' व्हायचे असेल, तर आहार, विहार आणि नियमित व्यायाम या त्रिसूत्रीकडे सर्वांनी विशेष लक्ष दिले पाहिजे. योग ही केवळ एक शारीरिक कसरत नसून ती जीवन जगण्याची समृद्ध कला आहे असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष व माजी आमदार भीमराव धोंडे यांनी येथे केले.

आष्टी येथील भगवान महाविद्यालय आवारात आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी योगगुरू प्रा.भा.दे. जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला योगगुरू प्रा.भा.दे. जगताप यांनी उपस्थितांना योगाचे महत्त्व पटवून दिले . त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन विद्यार्थी,प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी विविध प्रकारची आसने,प्राणायाम आणि ध्यानसाधना केली . 'करो योग, रहो निरोग' चा संदेश देत संपूर्ण महाविद्यालय परिसर योगमय झाला होता. याप्रसंगी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते



योगगुरू प्रा. जगताप यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

या योग दिनाच्या औचित्याने व्यासपीठावर अनेक मान्यवर उपस्थित होते.प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ,ज्येष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब खेमगर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी- विद्यार्थिनी उपस्थित होते. सर्वांनीच अत्यंत उत्साहाने या योग शिबिरात सहभाग नोंदवला.

सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. आप्पासाहेब टाळके यांनी केले,तर उपस्थितांचे व मार्गदर्शकांचे आभार प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ यांनी मानले.

राष्ट्रगीताने या यशस्वी योग दिन सोहळ्याची सांगता झाली. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे आष्टी परिसरात कौतुक होत आहे.

# आयएसटीडी नवी मुंबईची २०२६-२८ करिता नवीन समिती स्थापन

## डॉ. कुलदीप भालेराव यांची अध्यक्षपदी निवड; नवीन कार्यकारिणीकडून प्रशिक्षण व विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात

**नवी मुंबई :** इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट,नवी मुंबईची सन २०२६-२८ या कालावधीसाठी नवीन कार्यकारिणी समितीची निवड करण्यात आली आहे. २० जून २०२६ रोजी पार पडलेल्या १० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत निवडून आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांची अधिकृत घोषणा करण्यात आली.

अध्यक्षपदी डॉ. कुलदीप भालेराव यांची निवड करण्यात आली आहे. शिक्षण, व्यवस्थापन विकास आणि प्रशिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे डॉ. भालेराव हे कौशल्य विकास, विद्यार्थी मार्गदर्शन तसेच उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील समन्वयासाठी सातत्याने योगदान देत आहेत.



नवीन कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्षपदी डॉ. वैशाली पाटील, सचिवपदी इमॅन्युअल जोसेफ आणि खजिनदारपदी डॉ. एन. महेश यांची निवड करण्यात आली आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून महेश गंभीर, संदीप सिंग, डॉ. अस्मत आरा शेख आणि आशिष ठाकूर यांची निवड झाली आहे. तसेच राष्ट्रीय समितीचे सदस्य म्हणून डॅनियल कुरियन, डॉ. दत्ताजीराव पाटील आणि रमेश नीलकंठण यांची निवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणीसमोर आय एस टी डी नवी मुंबईच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रमांना चालना देणे, नेतृत्व विकास घडविणे, व्यावसायिक कौशल्यवृद्धी करणे, ज्ञानाची देवाणघेवाण वाढविणे आणि सदस्यांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे.

नवीन अध्यक्ष डॉ. कुलदीप भालेराव यांनी सांगितले की, आय एस टी डी नवी मुंबईच्या माध्यमातून सदस्य, विद्यार्थी, व्यावसायिक आणि उद्योग क्षेत्रासाठी उपयुक्त असे प्रशिक्षण व विकासात्मक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी नवीन समिती पूर्ण क्षमतेने कार्य करेल. सर्व सदस्यांच्या सहकार्याने आय एस टी डी नवी मुंबईला अधिक सक्षम आणि गतिमान करण्याचा प्रयत्न राहील.

नवीन कार्यकारिणीच्या माध्यमातून आय एस टी डी नवी मुंबईच्या कार्याला नवी दिशा, नवी ऊर्जा आणि व्यापक व्यासपीठ मिळणार असून प्रशिक्षण व विकास क्षेत्रात चॅप्टर अधिक प्रभावी भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

नवीन समितीच्या निवडीबद्दल आय एस टी डी सदस्य, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी आणि विविध क्षेत्रातील व्यक्तींनी सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे व सदस्यांचे अभिनंदन केले आहे.

# पोटच्या मुलीवर 10 वर्षे लैंगिक अत्याचार ; नराधम बाप गजाआड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पोटच्या 16 वर्षांच्या निष्पाप मुलीवर तब्बल 10 वर्षे सातत्याने लैंगिक अत्याचार करणाऱ्या 55 वर्षीय नराधम पित्याला खांदेश्वर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नवीन पनवेल परिसरात घडलेल्या या अत्यंत संतापजनक आणि माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेमुळे संपूर्ण परिसरात प्रचंड संताप व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेतील पीडित मुलगी 2016 मध्ये केवळ 7 वर्षांची असल्यापासून छळ सुरु होता. आरोपी घरात पीडितेच्या आईच्या अनुपस्थितीत अथवा रात्रीच्या वेळी तिला वेगवेगळ्या प्रकारे त्रास देत होता. आई घरात नसताना पीडितेच्या इच्छेविरुध्द जबरदस्तीने अश्लिल आणि घृणास्पद कृत्य करण्यास तिला भाग पाडत होता. विरोध केल्यास तिला बेदम मारहाण आणि जीवे मारण्याच्या धमक्या होता. घाबरुन पीडित मुलीने सदर कृत्याची माहिती कुणालाही दिली नाही. सन 2024 मध्ये जेव्हा पीडित मुलगी 14 वर्षांची झाली, तेव्हाही या नराधम बापाची क्रुरता थांबली नाही. घरात कोणीही नसताना नराधम बापाने तिला वारंवार मारहाण करुन, जबरदस्तीने तिच्यावर अनैसर्गिक आणि लैंगिक अत्याचार केले. गेली 10 वर्षे सुरु असलेला सदरचा छळ सहन न झाल्याने अखेर पीडित मुलीने लहान मुलांच्या मदतीसाठी कार्यरत असलेल्या चाईल्ड लाईन या हेल्पलाईनवर संपर्क साधून त्यांच्याकडे मदतीची याचना केली. त्यानंतर चाईल्ड लाईनच्या कार्यकत्यांनी पीडित मुलीसह खांदेश्वर पोलीस ठाणे गाठून तिच्या वडिलांविरोधात तक्रार दाखल केली. या घटनेचे गांभीर्य ओळखून खांदेश्वर पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणातील आरोपी बापाला तात्काळ अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्याला 2 दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्मिता ढाकणे यांनी दिली.

# जासई विद्यालयात जागतिक योग दिन कार्यक्रम संपन्न !

**दैनिक युवक आधार**

**उरण प्रतिनिधी / सागर घरत** : रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.बा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग,जासई.ता.उरण जि.रायगड या विद्यालयात 21 जून हा जागतिक योग दिन कार्यक्रम संपन्न झाला. विद्यालयाच्या प्राचार्या सौ.म्हात्रे के.जी. मॅडम यांनी या कार्यक्रमासाठी लाभलेले योग मार्गदर्शक श्री.शशिकांत म्हात्रे सर,सेवानिवृत्त पर्यवेक्षक, जे.एन.पी.टी. शाळा यांचे स्वागत केले.

त्यांनी आरोग्याचे महत्व सांगून ,योग आणि व्यायाम ही आरोग्याची गुरुकिल्ली आहे असे महत्त्वपूर्ण मार्गदर्शन या कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना केले.

विद्यालयाच्या प्रांगणात सकाळी सर्व विद्यार्थ्यांना योगाची माहिती सांगून श्री. शशिकांत म्हात्रे सर यांनी विविध योगाची प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून व सर्व सेवकांकडून



करवून घेतली. या कार्यक्रमा साठी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री. कुटे सर ,पर्यवेक्षिका सौ.मुकादम मॅडम व सर्व सेवक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व पाहुण्याचे आभार सौ. वर्तक डी . आर . मॅडम यांनी करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था श्री कृपा योगा क्लासेसच्या वतीने उरण मध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था, उरण' आणि 'श्री योगा फिटनेस क्लासेस' यांच्या संयुक्त विद्यमाने आज, २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या अंतर्गत उरण येथील 'जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे एन. आय. हायस्कूल' येथे विद्यार्थ्यांसाठी विशेष योग प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. यानंतर, संस्थेच्या वतीने उरण येथील प्रसिद्ध पिरवाडी समुद्रकिनारी महिलांसाठी खास योग प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात कोपरखैरणे-वाशी येथील योग शिक्षिका शबाना खान यांनी उपस्थित महिलांना योगासनांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक दाखवून आरोग्यासाठी योगाचे महत्त्व पटवून दिले.

या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन आणि व्यवस्थापन चोख करण्यात आले होते. 'श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थे'च्या अध्यक्षा संगीता ढेरे आणि 'श्री योगा क्लासेस'च्या योगशिक्षिका शिल्पा ठाकूर यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. आणि मोलाचे योगदान दिले. त्यांच्या या प्रयत्नांमुळे कार्यक्रमाला मोठ्या संख्येने महिला साधक उपस्थित होत्या. व त्यांनी या योग प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

योग प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर 'श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्थे'मार्फत सामाजिक बांधिलकी जपत उपस्थित सर्व महिलांना मोफत सॅनिटरी नॅपकिनचे वाटप करण्यात आले. महिलांच्या आरोग्याविषयी आणि मासिक पाळीदरम्यान घ्यावयाच्या काळजीबद्दल समाजात जनजागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने आज सुट्टी उपक्रम राबविण्यात आला आरोग्य सोबतच स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या दुहेरी उपक्रमाचे आणि दोन्ही संस्थांच्या सामाजिक कार्याचे विशेष कौतुक होत आहे.



# रोडपाली परिसरातील नागरी समस्यांवर ३० जून रोजी महापालिकेवर धडकणार हजारो नागरिकांचा संतप्त मोर्चा!

## ज्येष्ठ नेते भाई जगदीश गायकवाड यांचा पनवेल महापालिका व महावितरण प्रशासनाला इशारा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : "पनवेल महानगरपालिका हद्दीत नागरिकांना पाणी आणि वीज यांसारख्या मूलभूत सोयीसुविधा मिळत नाहीयेत. महावितरणचा सावळा गोंधळ दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यातच आता रोडपाली गावात निवासी भागात महापालिकेने डंपिंग ग्राउंड उभारण्याचा घाट घातला आहे. या अन्यायाविरोधात आता पनवेलची जनता शांत बसणार नाही," असा आक्रमक पवित्रा बहुजन चळवळीतील ज्येष्ठ नेते भाई जगदीश गायकवाड यांनी घेतला आहे. या सर्व प्रलंबित मागण्यांसाठी येत्या 30 जून 2026 रोजी पनवेल महानगरपालिकेवर हजारो नागरिकांच्या उपस्थितीत भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी आज पत्रकार परिषदेत केली.




रविवार, 21 जून 2026 रोजी पनवेल येथील हॉटेल पीस पार्क येथे आयोजित पत्रकार परिषदेत भाई जगदीश गायकवाड यांच्यासह काँग्रेसचे नेते सुदाम पाटील, मा.शिक्षण सभापती बेबीताई गायकवाड आदी उपस्थित होते. यावेळी जगदीश गायकवाड यांनी पनवेलमधील विविध नागरी समस्यांवरून प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांवर कडक शब्दांत ताशेरे ओढले. रोडपाली डंपिंग ग्राउंडला तीव्र विरोधः रोडपाली गावातील निवासी भागात पनवेल महानगरपालिकेकडून डंपिंग ग्राउंड प्रस्तावित आहे. यामुळे स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात येणार असून, या प्रकल्पाला जनतेचा तीव्र विरोध आहे. हा प्रकल्प तातडीने रद्द करावा, अशी मागणी करण्यात आली. तसेच पनवेल हद्दीत वारंवार होणारे वीज खंडित होण्याचे प्रमाण आणि महावितरणच्या गलथान कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. या सावळ्या गोंधळाला पायबंद घालण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे 'लाईट, पाणी नाहीच, आता या डंपिंग ग्राउंडचे करायचे काय?' असा संतप्त सवाल करत पनवेलमधील रस्ते, पाणी आणि वीज या मूलभूत समस्या सोडवण्यात महापालिका अपयशी ठरल्याचा आरोप गायकवाड यांनी केला. यासंदर्भात पनवेल येथील प्रांत कार्यालय येथून पनवेल महानगरपालिकेवर 30 जून रोजी सकाळी 11 वाजता प्रशासनाच्या या मनमानी कारभाराचा जाब विचारण्यासाठी आणि नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी हजारो नागरिकांच्या संख्येने विराट मोर्चा काढण्यात येणार आहे.

या मोर्चामध्ये पनवेल आणि रोडपाली परिसरातील सर्व नागरिकांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भाई जगदीश गायकवाड यांनी केले आहे."

> **पनवेल महानगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी हे मस्तवाल झाले असून ते कोणाला जुमानत नाही आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या प्रश्नावर त्यांच्याकडे कोणतेही उत्तर नसून फक्त टेंडर सिस्टीम याकडे त्यांचे लक्ष आहे. याचा विस्फोट येत्या 30 तारखेला महामोर्चाद्वारे झालेला दिसेल.**
>
> **काँग्रेस नेते सुदाम पाटील**

# नवीन पनवेलमध्ये अतिक्रमण कारवाईत भेदभावाचा आरोप

## दोषी कर्मचाऱ्यांवर कारवाईची नागरिकांची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : नवीन पनवेल परिसरातील अतिक्रमण कारवाईत पनवेल महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून भेदभाव होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. विशेषतः सेक्टर 17 येथील मंगलमूर्ती रोज बाजार परिसरातील काही बेकायदेशीर खाद्यपदार्थ विक्रेत्यांवर कारवाई होत नसल्याबाबत नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, मंगलमूर्ती रोज बाजार परिसरात काही खाद्यपदार्थ विक्रेत्यांनी फूटपाथवर अतिक्रमण करून व्यवसाय सुरू ठेवला असून, तेथील जागांवर अनधिकृतपणे भाडे वसूल केले जात असल्याचाही आरोप करण्यात आला आहे. संबंधित विक्रेते सत्ताधारी पक्षाशी संबंधित कार्यकर्ते असल्याने त्यांच्यावर कारवाई टाळली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

याबाबत नागरिकांचे म्हणणे आहे की, अतिक्रमण विभागातील कर्मचारी जनतेच्या करातून पगार घेत असले तरी प्रत्यक्षात सत्ताधारी पक्षाशी संबंधित घटकांच्या हिताचे काम करत असल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे सर्व अतिक्रमणधारकांवर समान निकषांनुसार कारवाई व्हावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

दरम्यान, नवीन पनवेल परिसरातील अतिक्रमणांचे फोटो आणि व्हिडिओ नागरिकांनी सोशल मीडियावर प्रसारित करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे.

मात्र, या तक्रारींकडे महापालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे.

पनवेल महापालिकेचे आयुक्त यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून अतिक्रमण विभागातील संबंधित कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी तसेच पक्षपातीपणा आढळल्यास त्यांच्यावर कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# अर्धापूर तालुक्यातील देगाव कु-हाडा येथे तरुण शेतकऱ्याची आत्महत्या ; परिसरात हळहळ"

**दैनिक युवक आधार**

**अर्धापूर ग्रामीण गंगाधर कदम तालुका प्रतिनिधी** : अर्धापूर तालुक्यातील देगाव कु-हाडा येथील २७ वर्षीय तरुण शेतकरी काशिनाथ बालाजी कदम यांनी राहत्या घरी छताच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सततची नापिकी, शेतीतील वाढते आर्थिक संकट आणि कर्जबाजारीपणाच्या



ओझ्याखाली दबलेल्या या तरुण शेतकऱ्याने अखेर जीवनयात्रा संपवण्याचा टोकाचा निर्णय घेतला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

शेती हा देशाचा कणा मानला जातो, मात्र त्याच शेतकऱ्याला आज निसर्गाच्या लहरीपणाशी, वाढत्या उत्पादन खर्चाशी आणि आर्थिक विवंचनांशी झुंज द्यावी लागत आहे. अशा परिस्थितीत एका तरुण बळीराजाने आयुष्य संपवल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.या घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून पुढील कार्यवाही केली आहे.

# सहकारमहर्षी माणिकराव दादा पालोदकर यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थिनींना मोफत पासचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, सिल्लोड येथे दि. १९ जून रोजी सहकारमहर्षी, माजी मंत्री माणिकराव दादा पालोदकर यांच्या जयंतीनिमित्त सिल्लोड परिवहन विभागाच्या वतीने 'अहिल्याबाई होळकर मोफत पास' योजनेअंतर्गत शाळेतील विद्यार्थिनींना मोफत पास वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला दादासाहेब पालोदकर यांच्या प्रतिमेस



पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर इयत्ता १० वी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

यावेळी विभागीय वाहतूक अधीक्षक स्वाती बाखडे, वाहतूक निरीक्षक सतीश अंभोरे, सतीश बावस्कर आणि मुख्याध्यापक निशांत म्हस्के यांच्या हस्ते मोफत पासचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी मुख्याध्यापक निशांत म्हस्के आणि संगीता तायडे यांनी दादासाहेब पालोदकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला, तर वाहतूक अधीक्षक स्वाती बाखडे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या योजनांबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृष्णा सपाटे यांनी केले.

याप्रसंगी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन डमाळे, निवृत्त शिक्षक रमेश सोनवणे, सहाय्यक वाहतूक निरीक्षक पोपट मगर, वरिष्ठ लिपिक बाबुराव पंडित, वरिष्ठ लिपिक निवृत्ती सपकाळ, लेखाधिकारी स्वाती डेरे, पोलीस पाटील मनोज शिहिरे, संगीता तायडे, संगीता काळे, लक्ष्मण कोलोड, मधुकर मगर, नरेश सिंग राजपूत, रमेश परदेशी, गणेश चव्हाण, अमोल ताटू, अंगत काळे, गजानन दौड, अरविंद सोनवणे, पंकज सावंत, भास्कर सागरे, नम्रता वडमारे, हर्षदा सणांसे, रमेश सपकाळ, शैलेश मोरे यांची उपस्थिती होती.

# शून्यातून विश्व निर्माण करणारे चंद्रशेखर बावनकुळे : पुत्र संकेत बावनकुळेंची फादर्स डे निमित्त भावपूर्ण कृतज्ञता

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका नागपूर** : महाराष्ट्राच्या राजकारणात, सामाजिक क्षेत्रात आणि जनसेवेच्या माध्यमातून स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे भाजप प्रदेशाध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते चंद्रशेखर कृष्णराव बावनकुळे यांच्याविषयी त्यांच्या पुत्राने फादर्स डे निमित्त व्यक्त केलेल्या भावना सध्या चर्चेचा विषय ठरत आहेत. संघर्षातून यशाचे शिखर गाठणाऱ्या वडिलांविषयी व्यक्त केलेल्या या भावना अनेकांना प्रेरणादायी वाटत आहेत.

आपल्या भावनिक संदेशात त्यांनी म्हटले आहे की, काही व्यक्तींची ओळख त्यांच्या पदामुळे होते, काहींची कर्तृत्वामुळे; मात्र काही व्यक्तिमत्त्वांचा संपूर्ण जीवनप्रवासच प्रेरणेचा ग्रंथ असतो. चंद्रशेखर बावनकुळे यांचे व्यक्तिमत्त्व असेच असून, एकेकाळी रिक्षाचालक म्हणून संघर्षमय आयुष्य जगणाऱ्या व्यक्तीने अथक परिश्रम, जिद्द आणि जनसेवेच्या बळावर राज्यभरात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे.

त्यांनी बालपणापासून वडिलांचा जनतेशी असलेला आत्मीय संबंध जवळून पाहिल्याचे सांगितले. कोणताही नागरिक त्यांच्या दारातून रिकाम्या मनाने परत गेला नाही. कोणी समस्या घेऊन आले, कोणी वेदना तर कोणी



अपेक्षा घेऊन आले; मात्र प्रत्येकाला समाधान मिळावे यासाठी त्यांनी कायम प्रयत्न केले. समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावरचे समाधान हेच त्यांच्या जीवनातील सर्वात मोठे यश असल्याचे त्यांनी नमूद केले.

समाजहित, विकास, संघटन आणि जनसेवा या विचारांनी चंद्रशेखर बावनकुळे यांचे संपूर्ण आयुष्य व्यापलेले असल्याचे सांगताना त्यांनी वडिलांच्या कार्यक्षमतेचे विशेष कौतुक केले. वयाची ५७ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही त्यांच्यातील ऊर्जा, कामाचा उत्साह आणि समाजासाठी झटण्याची तळमळ एखाद्या तरुणालाही प्रेरणा देणारी असल्याचे त्यांनी म्हटले.

यावेळी त्यांनी आपल्या वडिलांच्या कुटुंबवत्सल स्वभावाचाही उल्लेख केला. जनतेचे नेते म्हणून काम करत असतानाच प्रेमळ आणि मायाळू आजोबा म्हणून कुटुंबातही ते तितकेच जिव्हाळ्याचे स्थान राखून असल्याचे त्यांनी सांगितले.

"तुमच्या कर्तृत्वाची उंची गाठणे कदाचित शक्य होणार नाही, पण तुमच्या संस्कारांच्या पाऊलखुणांवर चालण्याचा प्रयत्न आयुष्यभर करत राहीन," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच समाजासाठी झटताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेण्याची विनंतीही त्यांनी वडिलांना केली.

फादर्स डेच्या निमित्ताने व्यक्त केलेल्या या भावनिक संदेशाच्या शेवटी त्यांनी आई जगदंबेच्या चरणी वडिलांना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थना केली. संघर्ष, जनसेवा आणि कर्तृत्वाचा आदर्श निर्माण करणाऱ्या चंद्रशेखर बावनकुळे यांच्या जीवनप्रवासाला त्यांच्या पुत्राने वाहिलेली ही भावपूर्ण मानवंदना अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# पालोदमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह; विद्यार्थी-शिक्षकांचा योगाभ्यासात सहभाग

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त सिल्लोड तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालय आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या संयुक्त विद्यमानाने योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

याप्रसंगी योग शिक्षक कृष्णा पाटील व अशोक दांडगे यांनी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांना कपालभाती, भस्त्रिका, पद्मासन, वज्रासन, पवनमुक्तासन, भुजंगासन, धनुरासन, ताडासन, वृक्षासन, हास्यासन व सूर्यनमस्कार यांसारख्या विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून दिले. जिल्हा परिषद प्राथमिक



शाळेचे मुख्याध्यापक दिलिप सपकाळ यांनी योगाचे महत्त्व स्पष्ट करताना, "योग म्हणजे शरीर, मन आणि आत्म्याचे एकत्रीकरण आहे. शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी आणि एकाग्रता वाढवण्यासाठी नियमित योगाभ्यास अत्यंत आवश्यक आहे," असे सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रदीप कानडजे यांनी आपल्या मनोगतात, "आजच्या धकाधकीच्या जीवनात तणावमुक्त राहण्यासाठी आणि सकारात्मक दृष्टिकोन विकसित करण्यासाठी योग हा सर्वोत्तम मार्ग आहे," असे नमूद केले.या कार्यक्रमात महाविद्यालयाचे व शाळेचे शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. सर्वांनी नियमित योगाभ्यासाचा संकल्प करून कार्यक्रमाची सांगता केली.

# वाढवण बंदर : भारताच्या जागतिक व्यापार महत्त्वाकांक्षांना बळ देणारे सागरी केंद्र

**दैनिक युवक आधार**


**प्रतिनिधी / पालघर :** भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना, महाराष्ट्रातील पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर हा देशातील सर्वात महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. सुमारे ₹76,220 कोटींच्या गुंतवणुकीसह उभारले जाणारे हे बंदर भारताच्या व्यापार, निर्यात, लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक विकासाला नवी दिशा देणार आहे. पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर ते जगातील अव्वल 10 बंदरांमध्ये स्थान मिळवू शकते.

30 ऑगस्ट 2024 रोजी भूमिपूजनाच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या प्रकल्पाला महाराष्ट्र आणि भारताच्या विकास प्रवासातील ऐतिहासिक टप्पा असे संबोधले. त्यांच्या मते, वाढवण बंदर हे भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असेल आणि ते देशाच्या व्यापार व औद्योगिक विकासाचे प्रमुख केंद्र बनेल.

वाढवण बंदराची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्याची नैसर्गिक 20 मीटर खोली. यामुळे 24,000 TEU क्षमतेची अतिविशाल कंटेनर जहाजे येथे सहजपणे येऊ शकतील. परिणामी भारताला दुबई, सिंगापूर आणि कोलंबो यांसारख्या परदेशी ट्रान्सशिपमेंट केंद्रांवरील अवलंबित्व कमी करता येईल, तसेच निर्यातदारांचा वेळ आणि खर्च वाचेल.

पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर या बंदराची वार्षिक मालवाहतूक क्षमता 298 दशलक्ष मेट्रिक टन (MMT) आणि कंटेनर हाताळणी क्षमता 24.5 दशलक्ष TEUs इतकी असेल. ही क्षमता भारतातील अनेक विद्यमान प्रमुख बंदरांच्या एकत्रित क्षमतेशी स्पर्धा करणारी आहे. त्यामुळे भारताच्या निर्यात साखळीमध्ये मोठा बदल घडून येण्याची अपेक्षा आहे.

वाढवण बंदर भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (IMEC) आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर (INSTC) यांच्याशी जोडले जाणार असल्यामुळे जागतिक व्यापार साखळीतील भारताचे स्थान अधिक मजबूत होईल. महाराष्ट्राची सध्याची निर्यात सुमारे 70 अब्ज डॉलर्स इतकी असून, या बंदरामुळे राज्य आणि देशाच्या निर्यात क्षमतेत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे.




बंदराला दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, राष्ट्रीय महामार्ग आणि आधुनिक रेल्वे नेटवर्कशी जोडण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि कर्नाटकमधील उद्योगांना जागतिक बाजारपेठेशी थेट संपर्क साधता येईल.

वाढवण बंदर हा केवळ पायाभूत सुविधा प्रकल्प नसून रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विकासाला चालना देणारा मोठा आर्थिक उपक्रम आहे. या प्रकल्पामुळे सुमारे 12 लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याचा अंदाज आहे. लॉजिस्टिक्स, वेअरहाऊसिंग, जहाज सेवा, कंटेनर हाताळणी, कोल्ड चेन, वाहतूक, उत्पादन उद्योग, निर्यात प्रक्रिया केंद्रे आणि पर्यटन यांसारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगार आणि गुंतवणुकीच्या संधी उपलब्ध होतील.

याशिवाय, वाढवण बंदरामुळे उत्तर कोकण आणि पालघर परिसर राष्ट्रीय औद्योगिक नकाशावर नवीन आर्थिक केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो. बंदराभोवती विकसित होणारी औद्योगिक परिसंस्था स्थानिक उद्योजकता, कौशल्य विकास आणि पायाभूत सुविधांच्या उन्नतीस गती देईल.

भारत जागतिक उत्पादन आणि पुरवठा साखळीत आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करत असताना, वाढवण बंदर हे ब्ल्यू इकॉनॉमी, सागरमाला आणि विकसित भारत 2047 या राष्ट्रीय विकास दृष्टिकोनाला बळ देणारे महत्त्वाचे केंद्र ठरेल.

हे बंदर केवळ मालवाहतुकीचे केंद्र न राहता भारताच्या आर्थिक सामर्थ्याचे, जागतिक व्यापारातील वाढत्या प्रभावाचे आणि औद्योगिक क्षमतेचे प्रतीक बनेल.

2047 मध्ये भारत विकसित राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील तेव्हा त्या यशोगाथेत वाढवण बंदराचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाईल.

हे बंदर भारताच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा, औद्योगिक प्रगती आणि जागतिक नेतृत्वाच्या स्वप्नांना दिशा देणारे केंद्र ठरेल.

## योगातून निरोगी जीवनाचा संदेश; सिद्धार्थ विद्यालयात उत्साहात जागतिक योग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**स्वप्नील काटवले भंडारा** : सिद्धार्थ विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय, सावरी/मुरमाडी येथे जागतिक योग दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्या कु. स्वाती वासनिक उपस्थित होत्या.यावेळी प्राचार्या कु. स्वाती वासनिक यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगताना, निरोगी शरीर, सुदृढ मन आणि सकारात्मक जीवनशैलीसाठी योग अत्यंत आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. नियमित योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक स्वास्थ्य टिकून राहते तसेच एकाग्रता, आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढते, असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमात शारीरिक शिक्षक श्री. काशिवार सर यांच्या मार्गदर्शनाखाली




विविध योगासने, प्राणायाम आणि व्यायाम प्रकारांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. त्यांनी प्रत्येक व्यायामाचे आरोग्यदायी फायदे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योगाभ्यास केला.या प्रसंगी विद्यालयातील मनोज खोब्रागडे, विजय रिनाईत, एच. एच. मेमन, सुभाष ठाकरे, शिरीष लोगडे, भरत राऊत, आशिष सिंगनजुडे, वंदना आगाशे, सुरेखा भुरे, मनीषा सुखदेवे, स्मिता आगाशे, प्रतिभा अगळे, स्वाती खोटेले, कविता साठवणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमातून "योग करा, निरोगी रहा" हा संदेश देत विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली. संपूर्ण परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता.

## लाखनी येथे जागतिक योग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : लाखनी येथे पतंजली योग समिती लाखनी तसेच समर्थ महाविद्यालय लाखनीच्या संयुक्त विद्यमाने जागतिक योग दिवस कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. जागतिक योग दिनानिमित्त कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. नरेश चारमोडे, श्री .सुनील भाग्यवानी सर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य कापसे यावेळी उपस्थित होते. सकाळी 6 ते 7 या वेळेत महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर योग प्रात्यक्षिक द्वारे उपस्थित साधकांना मार्गदर्शन करण्यात आले. अध्यक्षीय मार्गदर्शनातून कापसे यांनी योगा विषयी विस्तृत माहिती दिली. प्रमुख अतिथी डॉ. नरेश चारमोडे यांनी योगासने आणि चुंबक चिकित्सा याविषयी साधकांना मार्गदर्शन केले तर पतंजली योग समिती तालुका प्रभारी सुनील भाग्यवानी आणि



त्यांच्या सहकाऱ्यांनी प्राणायाम व योगा विषयी प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले. लाखनी नगरातील असंख्य योग साधक, महिला वर्ग कार्यक्रमाला उपस्थित होते .नगरातील सर्व योग वर्ग शिक्षकांचा यावेळी पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित साधकांना अल्पोपहार देण्यात आला .संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन तसेच आभार प्रदर्शन शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रा. डॉ. धनंजय गिरीपूजे यांनी केले .पतंजली योग समितीचे सर्व सदस्यांनी तसेच समर्थ महाविद्यालयातील सर्व घटकांनी यावेळी सहकार्य केले.

## सिल्लोड पंचायत समितीत योग दिन साजरा

### जि.प. आरोग्य व शिक्षण सभापती अनिताताई मोठे उपस्थित




**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज सिल्लोड पंचायत समितीच्या आवारात विशेष योग सत्राचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषदेच्या आरोग्य व शिक्षण सभापती अनिताताई ज्ञानेश्वर मोठे यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांनी एकत्रितपणे योगासने केली.जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. व गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका आरोग्य अधिकारी व गटशिक्षण अधिकारी कार्यालयाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सकाळी ६.३० ते ७.३० या वेळेत झालेल्या या सत्रात ८० हून अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. योग प्रशिक्षक समाधान पंडित व काळंम पाटील यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, प्राणायाम व ध्यानधारणेचे मार्गदर्शन केले.

सभापती अनिताताई मोठे यांनी नियमित योगाचा संकल्प करण्याचे आवाहन केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नासेर खान पठाण यांनी योगाचे महत्त्व विषद केले, तर शिक्षण विस्तार अधिकारी रमेश ठाकूर यांनी योगाचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट केले.या सत्रात ज्ञानेश्वर मोठे, सुनील मिरकर, बालविकास प्रकल्प अधिकारी सुनिता सनान्से, कनिष्ठ प्रशासन अधिकारी रंजना कांबळे, विस्तार अधिकारी (आरोग्य) समाधान जाधव, तालुका अभियान व्यवस्थापक (महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान) तुषार बर्गत, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी (महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना) अरुण घोलप, शाखा अभियंता (बांधकाम) दादासाहेब काळे यांच्यासह अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रमेश ठाकूर यांनी आभार मानले.

## दर्यापूर तालुक्यात अद्यापही पावसाची प्रतीक्षा; शेतकऱ्यांची नजर आभाळाकडे

### समाधानकारक पाऊस नसल्याने खरीप पेरण्या रखडल्या ; कृषी विभागाकडून घाई न करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**दर्यापूर काळे तालुका प्रतिनिधी** : दर्यापूर जून महिना अर्ध्यावर आला असतानाही दर्यापूर तालुक्यात समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. कोरडवाहू शेतीवर अवलंबून असलेल्या तालुक्यातील अनेक गावांमध्ये पावसाअभावी खरीप हंगामातील पेरण्या रखडल्या असून शेतकऱ्यांची नजर आता आभाळाकडे लागून राहिली आहे.

यंदा मान्सून वेळेवर दाखल होईल आणि शेतीची कामे सुरळीत सुरू होतील, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली होती. मात्र, अद्यापही पुरेसा पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही शेतकऱ्यांनी पावसाच्या आशेवर शेत मशागतीची कामे पूर्ण केली असली



**"बियाणे, खत आणि मशागतीवर आधीच खर्च झाला आहे. आता पाऊस न आल्याने चिंता वाढली आहे. पेरणी उशिरा झाली तर उत्पादन घटण्याची शक्यता आहे."**
**तुळशीराम तायडे भालशी ,शेतकरी**

तरी पेरणीसाठी आवश्यक ओलावा नसल्याने ते प्रतीक्षेत आहेत.

दर्यापूर तालुका हा प्रामुख्याने कोरडवाहू पट्टा म्हणून ओळखला जातो. त्यामुळे पावसाचा प्रत्येक दिवस शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा ठरतो. पावसाने दडी मारल्यास बियाणे, खत आणि मशागतीवर झालेला खर्च वाया जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न भविष्यात गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे."पाऊस पडल्याशिवाय शेतीची चाके फिरणार नाहीत. आता सर्व आशा आभाळाकडेच लागल्या आहेत," अशी भावना अनेक शेतकऱ्यांनी व्यक्त केली. हवामान विभागाकडून लवकरच पावसाला पोषक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात येत असली तरी प्रत्यक्ष पाऊस कधी बरसणार, याकडे दर्यापूर तालुक्यातील शेतकरी वर्गाचे लक्ष लागून आहे. सध्या तरी "पाऊस कधी येणार?" हा एकच प्रश्न शेतकऱ्यांच्या मनात घोळत असून चांगल्या पावसाच्या प्रतीक्षेत संपूर्ण तालुका आभाळाकडे डोळे लावून बसला आहे.

**"दर्यापूर तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नसल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. किमान 75 ते 100 मिमी पाऊस होऊन जमिनीत पुरेशी ओल निर्माण झाल्यानंतरच पेरणी करावी. अपुऱ्या पावसावर केलेली पेरणी दुबार पेरणीचे संकट निर्माण करू शकते. योग्य पावसाची खात्री झाल्यावरच पेरणी करून आर्थिक नुकसान टाळावे."**
**आरती साबळे तालुका कृषि अधिकारी;दर्यापूर**

**"कोरडवाहू भाग असल्यामुळे आमची संपूर्ण शेती पावसावर अवलंबून आहे. दररोज आभाळ भरून येते, पण पाऊस पडत नाही. त्यामुळे शेतकरी कुटुंबांमध्ये चिंतेचे वातावरण आहे."**
**अंकुश पाटील कावडकर शेतकरी;दर्यापूर**

**जून महिना संपत आला तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. शेताची मशागत करून ठेवली आहे, पण पेरणी करण्याइतका पाऊस झाला नाही. पाऊस आणखी लांबला तर खरीप हंगामावर परिणाम होण्याची भीती आहे."**
**संदीप गोरखनाथ रायबोले शेतकर;नांदरून**

## जागतिक योग दिनानिमित्त सेक्टर 6 मधील राधाकृष्ण मंदिरात योगा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त राधाकृष्ण मंदिर, सेक्टर 6 येथे भव्य योगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम स्थायी समितीचे सभापती बबन मुकादम यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला नगरसेविका सौ. बायजा बबन बारगजे, भाजपा भटके विमुक्त मोर्चाचे जिल्हाध्यक्ष बबन बारगजे, महिला



आघाडीच्या उत्तर रायगड जिल्हा अध्यक्षा प्रिया मुकादम तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी योग प्रशिक्षक संतोष काशीद व विजय पांडे यांनी उपस्थित नागरिकांना विविध आसने व प्राणायामाचे सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व विशद करत सर्वांनी नियमित योगा करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक, महिला व तरुणांनी सहभाग नोंदवला. शेवटी सर्वांनी सामूहिक सूर्यनमस्कार करून कार्यक्रमाची सांगता झाली. स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनी उपस्थितांचे आभार मानले व अशा आरोग्यवर्धक उपक्रमांचे आयोजन भविष्यातही सुरू राहणार असल्याचे सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# सिकलसेलमुक्त समाजाच्या दिशेने कारंजा तालुक्याचे महत्त्वपूर्ण पाऊल; जागतिक सिकलसेल जनजागृती दिनानिमित्त भव्य जनजागृती कार्यक्रम संपन्न!

## "सिकलसेल हा संसर्गजन्य नव्हे तर अनुवंशिक आजार; तपासणी आणि जनजागृतीतूनच मिळेल प्रभावी नियंत्रण" – डॉ. एस. आर. नांदे

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : कारंजा १९ जून सिकलसेलमुक्त भारत आणि सिकलसेलमुक्त समाज निर्माण करण्याच्या उद्देशाने १९ जून जागतिक सिकलसेल जनजागृती दिनानिमित्त कारंजा येथे तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाच्या वतीने व्यापक जनजागृती कार्यक्रम उत्साहात आणि प्रभावी वातावरणात संपन्न झाला. सिकलसेल या गंभीर अनुवंशिक आजाराविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, वेळेवर तपासणीचे महत्त्व पटवून देणे आणि शासनाच्या सिकलसेल मुक्ती अभियानाला गती देणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.

या कार्यक्रमाला तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एस. आर. नांदे तसेच उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी आरोग्य विभागातील अधिकारी, कर्मचारी, सिकलसेल अभियानाशी संबंधित कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ. नांदे यांनी सिकलसेल या आजाराविषयी सविस्तर माहिती देत सांगितले की, सिकलसेल हा रक्ताशी संबंधित अनुवंशिक (वंशपरंपरागत) आजार असून तो पालकांकडून मुलांमध्ये संक्रमित होतो. हा आजार संसर्गजन्य नसून अनुवंशिक स्वरूपाचा असल्याने जनजागृती आणि वेळेवर तपासणी हाच त्यावर




प्रभावी उपाय आहे.

भारतामध्ये विशेषतः काही भागांमध्ये सिकलसेलचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढत असल्याने केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या आरोग्य विभागामार्फत "सिकलसेल मुक्ती अभियान" प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर तपासण्या, जनजागृती उपक्रम, आरोग्य शिबिरे आणि समुपदेशनाचे कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. यामुळे सिकलसेल वाहक आणि रुग्णांची वेळेत ओळख पटवून पुढील पिढीला या आजारापासून सुरक्षित ठेवण्याचे काम केले जात आहे.

डॉ. नांदे पुढे म्हणाले की, सिकलसेल वाहक अथवा रुग्ण व्यक्तींनी परस्पर विवाह टाळल्यास या आजाराचा प्रसार मोठ्या प्रमाणात रोखता येऊ शकतो. विवाहपूर्व सिकलसेल तपासणी ही काळाची गरज असून प्रत्येक युवक-युवतीने याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. सिकलसेलमुक्त समाज घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

तसेच शासनाच्या निर्देशानुसार ० ते ४० वर्षे वयोगटातील सर्व नागरिकांनी सिकलसेलची तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. नागरिकांनी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य केंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय अथवा उपजिल्हा रुग्णालयात जाऊन मोफत तपासणीचा लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी उपस्थितांना सिकलसेल आजाराची लक्षणे, त्याचे परिणाम, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि शासनामार्फत उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या आरोग्य सुविधांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी सिकलसेलबाबत अधिकाधिक जनजागृती करण्याचा संकल्पही व्यक्त केला. सिकलसेलबाबत महत्त्वपूर्ण माहिती..

सिकलसेल हा संसर्गजन्य नसून अनुवंशिक आजार आहे.

वेळेवर तपासणी केल्यास वाहक आणि रुग्णांची ओळख पटू शकते.

विवाहपूर्व सिकलसेल तपासणीमुळे भविष्यातील पिढीला या आजारापासून संरक्षण मिळू शकते. शासकीय आरोग्य संस्थांमध्ये सिकलसेल तपासणीची मोफत सुविधा उपलब्ध आहे.

सिकलसेलमुक्त समाज घडविण्यासाठी जनजागृती, तपासणी आणि समुपदेशन अत्यंत आवश्यक आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तालुका सिकलसेल सहाय्यक श्रीमती कविता पेठे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सिकलसेल प्रयोगशाळा तंत्रज्ञ मोहम्मद इद्रीस शेख यांनी केले. कार्यक्रमास तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिकलसेलमुक्त जिल्हा आणि निरोगी समाज घडविण्याच्या दिशेने कारंजा तालुक्यातील हा जनजागृती कार्यक्रम निश्चितच महत्त्वपूर्ण ठरला असून, नागरिकांनी तपासणी करून या अभियानात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे.

## ऑपरेशन थंडर फेज-2 अंतर्गत ॲलन करिअर इन्स्टिट्यूटमध्ये अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रम







**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : नागपूर शहर पोलीस आयुक्तांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या 'ऑपरेशन थंडर फेज-2' या विशेष मोहिमेअंतर्गत पोलीस ठाणे लकडगंज यांच्या वतीने ॲलन करिअर इन्स्टिट्यूट, लकडगंज येथे विद्यार्थ्यांसाठी अमली पदार्थ विरोधी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे तसेच विविध क्षेत्रांमध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. "Action – Prevention – Education" या संकल्पनेवर आधारित मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या वाढत्या धोक्याबाबत जागरूक करण्यात आले.

यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना नशेच्या व्यसनाचे शारीरिक, मानसिक, शैक्षणिक, आर्थिक आणि कौटुंबिक आयुष्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम उदाहरणांसह समजावून सांगण्यात आले. व्यसनामुळे युवकांचे करिअर, आरोग्य आणि सामाजिक जीवन कसे उद्ध्वस्त होऊ शकते, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात NDPS (Narcotic Drugs and Psychotropic Substances) कायद्यातील विविध तरतुदी, अमली पदार्थांचे सेवन, विक्री, साठवणूक व वाहतूक यासंबंधीचे कायदेशीर परिणाम आणि शिक्षेच्या तरतुदींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांचे गांभीर्य आणि त्यावरील कायदेशीर कारवाईची माहिती देऊन युवकांना सावध करण्यात आले.

मार्गदर्शनादरम्यान युवक हे देशाचे भविष्य असून त्यांनी नशेसारख्या घातक प्रवृत्तींपासून दूर राहून सकारात्मक, निरोगी आणि उद्दिष्टपूर्ण जीवनशैली स्वीकारावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच अमली पदार्थांबाबत कोणतीही संशयास्पद माहिती मिळाल्यास तात्काळ डायल 112 अथवा जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून चर्चेत सक्रिय सहभाग घेतला. नशामुक्त समाज निर्मितीसाठी स्वतः जागरूक राहण्याबरोबरच इतरांनाही जागरूक करण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी व्यक्त केला.

सदर जनजागृती कार्यक्रमाचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडिया तसेच प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून व्यापक स्तरावर प्रसारित करण्यात येत असून समाजात अमली पदार्थांविरोधात जनजागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

पोलीस ठाणे लकडगंज यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आलेला हा उपक्रम युवकांमध्ये अमली पदार्थांविषयी जागरूकता निर्माण करणारा ठरला असून 'ऑपरेशन थंडर फेज-2' मोहिमेच्या उद्दिष्टांना बळकटी देणारा महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे.

## उगाव शाळेत आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र शिक्षण संस्था, निमगाव जाळी संचलित छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालय, उगाव येथे रविवारी (दि. २१ जून) आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करून निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सामूहिक योगाभ्यासात सहभाग घेतला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नियमित योगाभ्यासाचे महत्त्व अधोरेखित केले. योगामुळे शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्यही उत्तम राहते. तसेच एकाग्रता, आत्मविश्वास, संयम आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करून निरोगी व संतुलित जीवन जगावे, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमात विद्यालयाचे क्रीडाशिक्षक भालचंद्र सूर्यवंशी व तांबोळी सर यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यानाच्या पद्धतींची प्रात्यक्षिके करून दाखवली. त्यांनी



विद्यार्थ्यांकडूनही विविध योगासने करून घेत योगाचे आरोग्यदायी फायदे समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत विविध आसनांचे सादरीकरण केले.

या प्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक नंदाराम ढिकले, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी उपस्थित राहून योग दिन साजरा केला. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांसमवेत योगासने करत 'योग हा जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे' हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून दिला.

योगाभ्यास, प्राणायाम आणि सामूहिक सहभागामुळे संपूर्ण विद्यालय परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता.

कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून योगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात यश आले. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## मैत्रीबोध परिवाराद्वारे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** मैत्रीबोध परिवाराने शांतिक्षेत्र प्रेमगिरी आश्रम, कर्जत येथे एका अनोख्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन केले. योग हा केवळ शारीरिक व्यायाम नसून भारताच्या सभ्यतागत आणि सांस्कृतिक वारशाचा अमूल्य भाग आहे. या विचाराला अधिक बळ देण्यासाठी केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत हे कार्यक्रमाला उपस्थित होते.

या प्रसंगी गोपाल कृष्ण अग्रवाल, आमदार महेंद्र सदाशिव थोरवे हेही कार्यक्रमाला उपस्थित होते. या कार्यक्रमामुळे योगाचा अनुभव केवळ आसने आणि शारीरिक व्यायाम यापुरता मर्यादित न राहता, शरीर, मन आणि चेतना यांच्या



एकात्मतेच्या रूपात घेता आला.

कार्यक्रमाला सांस्कृतिक रंगत आणण्यासाठी गणेश वंदना तसेच भारताची प्राचीन योगिक कला असलेल्या मल्लखांबाचे मनोहारी सादरीकरण करण्यात आले. मल्लखांब ही शक्ती, लवचिकता, संतुलन आणि शिस्त विकसित करणारी भारतीय परंपरेतील एक अद्वितीय कला आहे.

## श्री .छत्रपती हायस्कूल,सणसर येथे जागतिक योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : श्री. छत्रपती हायस्कूल,सणसर येथे रविवार (दि. २१ जून) रोजी ११ वा जागतिक योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थी, शिक्षक,पालक व ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली.

या कार्यक्रमासाठी बारामती येथील अवि डान्स क्लासेसचे झुंबा व योग प्रशिक्षक श्री. अविनाश लाड




(सर) तसेच योग प्रशिक्षक सौ. योगिता जामदार (मॅडम) प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून सांगत विविध योगासने, प्राणायाम आणि झुंबा डान्सची प्रात्यक्षिके अतिशय सोप्या व आकर्षक पद्धतीने करून दाखवली. विद्यार्थ्यांसह शिक्षकांनीही उत्साहाने सहभाग घेत योगाभ्यास केला.कार्यक्रमासाठी सकाळी ७ वाजल्यापासून विद्यार्थी, शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गावचे माजी सरपंच श्री. संतोष चव्हाण यांनीही प्रत्यक्ष योगासने करून विद्यार्थ्यांना आरोग्यदायी जीवनशैलीचा संदेश दिला.

संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन शाळेचे मुख्याध्यापक श्री. वायसे सर यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले. कार्यक्रमस्थळी कलाशिक्षक श्री.परशुराम घाडगे (सर) यांनी साकारलेल्या आकर्षक रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. गुणवंतराव वाघमोडे (सर) यांनी केले.शेवटी सर्वांनी एकत्रितपणे 'पसायदान'म्हणत कार्यक्रमाची सांगता केली. योगाच्या माध्यमातून निरोगी जीवनाचा संदेश देणारा हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरला.

## पनवेलच्या गोल्डन ग्रुपने जपली सामाजिक बांधिलकी राजीप शाळा रिटघर येथे केले शैक्षणिक साहित्य आणि छत्रीचे वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी** : "मैत्री हेच जीवन" हा संदेश समाजाला देत सामाजिक उपक्रमात सातत्याने अग्रस्थानी असणारी पनवेलची गोल्डन ग्रुप या संस्थेच्या वतीने शनिवार दिनांक २० जून रोजी शैक्षणिक साहित्य आणि छत्रीचे वाटप करण्यात आले. रायगड जिल्हा परिषदेच्या रिटघर येथील शाळेमध्ये गोल्डन ग्रुप सदस्यांनी सदर वाटप केले. या कार्यक्रमाला रिटघर ग्रामपंचायतचे सरपंच सुभाष पुंडलिक भोपी यांची प्रमुख उपस्थिती होती.शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पांडुरंग भोपी यांनी गोल्डन ग्रुप पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत केले.गोल्डन ग्रुपचे अध्यक्ष वसंत भगत आणि आधारस्तंभ निळकंठ भगत यांच्या




मार्गदर्शनाखाली हे वाटप संपन्न झाले. गोल्डन ग्रुपच्या वतीने रीटघर शाळेतील १६१ विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना बटन छत्रीचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना वह्या पेन, पेन्सिल, खोडरबर,शार्पनर, पट्टी असे शैक्षणिक साहित्य प्रदान करण्यात आले. सरपंच सुभाष भोपी यांनी गोल्डन ग्रुप करत असलेल्या समाजकार्याबद्दल आणि रिटघर राजिप शाळेत छत्री वाटप

**दिलदार मित्रांच्या सजग संस्थेने यापूर्वी समाजातील अंतिम घटकाला मूळ प्रवाहात आणण्यासाठी अनेक उत्तमोत्तम उपक्रम राबविले आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या गरजवंत शाळांना वर्ग उभारून देणे, रंगरंगोटी करून देणे, छप्पर बसून देणे, कपाटे भेट देणे अशा अनेक उपक्रमामुळे गोल्डन ग्रुप संस्था नावाजली गेली आहे.तसेच त्या संस्थेने विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप देखील केलेले आहे.**

केल्याबद्दल या संस्थेची प्रशंसा केली तसेच आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गोल्डन ग्रुपचे सदस्य मंदार दोंदे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना मित्र आणि मैत्री जपण्याचा कानमंत्र दिला. प्रत्येकाने आपल्या आयुष्यात आई-वडील, शिक्षक आणि मित्र हे जपलेच पाहिजेत असेही ते म्हणाले.या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अथक परिश्रम घेणारे अध्यक्ष वसंत भगत यांचा शिक्षक वृंदाच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला सरपंच सुभाष भोपी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पांडुरंग भोपी, निळकंठ भगत, वसंत भगत, पत्रकार विवेक पाटील, पत्रकार मंदार दोंदे, विजय पाटील, विजय पवार, अमोल गोवारी, संजय कोलकर, प्रसाद गायकवाड,किशोर थळे, विजय रेवसकर,श्रीमंत चिलवंत, श्रुती कोंडिलकर, कविता थळे, वैशाली पाटील, सुप्रिया नवले, देविदास भोपी यांची उपस्थिती होती.

## उमरी तालुका निराधारांचे मानधन तीन महिन्यांपासून मिळत नसल्याने लाभार्थी वंचीत

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रुपेशकुमार श्रीरामवार** : शासना कडुन संजय गांधी निराधार योजने अंतर्गत निराधारांना मिळणारे मानधन गेल्या तीन महिन्यापासुन मिळाले नसल्याने निराधारांवर उपासमारीची वेळ आली आहे. श्रावण बाळ योजनेचे एप्रिल मे जुन या तीन महिन्याचे मानधन मिळाले नसल्याने गोरगरीब सामान्य वृध्द, महिला, ज्यांना चालता येत नाही, ज्यांना मुला बाळाचा सुध्दा आधार नाही, असे लोक मानधन मिळाले नसल्याने तहसील कार्यालय व बँकेला भर उन्हात चकरा मारत आहेत. त्यातच अधिकाऱ्या कडून केवायसी करून घ्या आधार लिक नाही पोर्टल बंद

संजय गांधी निराधार अनुदान योजना

आहे असे सरास उत्तरे लाभार्थना दिली जात आहेत.

साहेब आमच्या गोर गरीबांना पैसे केव्हा देता हो, म्हणून टाहो फोडत आहेत. शासनाने अपंगाचे एका महिन्याचे मानधन, लाडकी बहिणीचे दोन महिन्याचे मानधन दिले. महाराष्ट्र शासनाकडुन निराधाराचे मानधन टाकण्यात आले नाही. ज्यांना कोणाचाच आधार नाही अशा निराधार, वयोवृध्द लोकांना आता गोळ्या औषधी घेण्यासाठी सुद्धा पैसे नाहीत. असे लोक तहसील कार्यालय व बँकेत भर ऊन्हात चकरा मारत असून जिल्हाधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देण्याची मागणी लाभार्थ्यांकडून होत आहे.

# भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चा पनवेल रायगडच्या वतीने योग दिवस उत्साहात साजरा

**▪ सय्यद अकबर यांच्या पुढाकारातून योग दिवस**
**▪ मुस्लिम महिला,पुरुष आणि बालकांचा उत्स्फूर्त सहभाग.**

**दैनिक युवक आधार**

**पनवेल/प्रतिनिधी** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून जगभरात साजरा केल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून, भारतीय जनता पार्टी अल्पसंख्याक मोर्चा पनवेल रायगड वतीने पनवेल तक्का येथील हजरत जमालशाह दर्गा येथे योग दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांच्या विशेष पुढाकारातून या अनोख्या योग शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यात मुस्लिम महिला, मदरसेचे लहान मुले आणि पुरुष मोठ्या संख्येने आणि उत्साहाने सहभागी झाले होते. अनेक मुस्लिम महिलांनी उपस्थित राहून योगासने केली आणि उत्तम आरोग्याचा संदेश दिला.

या योग शिबिरादरम्यान सय्यद अकबर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून निरोगी आणि संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे.प्रत्येक नागरिकांने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा स्वीकार करावा आणि आरोग्यदायी समाज निर्मितीस हातभार लावावा. उपस्थितांना निरोगी जीवनशैली आणि आरोग्याविषयी मोलाची माहिती देण्यात आली.

नियमित योगासने केल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्य कसे सुदृढ राहते, याचे महत्त्व यावेळी तज्ज्ञांनी पटवून दिले. बदलत्या जीवनशैलीत योगाचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे सांगत, प्रत्येकाने



आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा समावेश करावा,असे आवाहन यावेळी करण्यात आले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रदेश उपाध्यक्ष सय्यद अकबर यांच्यासोबतच अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य साबिर शेख,ॲड. मेहबूब पटेल,ट्रस्टी सिजान फकीर मुजावर,आयुब पठाण,दाऊद शेख,जरीना शेख आणि भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे इतर सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेतले.

सर्व स्तरांतून या उपक्रमाचे मोठे कौतुक होत असून, योग दिनाचा हा उत्साह सर्वसामान्यांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त उलवे येथे भव्य योग दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**उलवे, पनवेल :** आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी, उलवे आणि जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी ७.३० वाजता खारकोपर तलाव, सेक्टर ९, उलवे येथे भव्य योग दिन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमाला नागरिक, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच योगप्रेमी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

भारताचे लोकप्रिय आणि यशस्वी पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी जी यांच्या प्रेरणेतून संपूर्ण जगभर साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमामध्ये सामूहिक योगाभ्यास, प्राणायाम आणि विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. उपस्थितांनी योगाचे महत्त्व जाणून घेत निरोगी जीवनशैलीचा संकल्प केला.

भारतीय जनता पक्ष आणि जे एम म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे पदाधिकारी, जिल्हा परिषद-पंचायत समिती, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, उलवे पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी, श्री कच्छी लेवा पटेल समाजाचे सदस्य, मीना योगा ग्रुप, बुद्धिस्ट वेल्फेअर कमिटीचे पदाधिकारी व सदस्य तसेच "आम्ही उलवेकर मित्र मंडळ" उलवे



मधील विविध सामाजिक संस्था यांच्या मोठ्या सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष उत्साह आणि भव्यता प्राप्त झाली.

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रितम जे. म्हात्रे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. समाजातील विविध घटक, सामाजिक संस्था, स्वयंसेवी संघटना आणि नागरिकांना एकत्र आणून हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या नेतृत्वाखाली सर्व सहभागी संस्था आणि कार्यकर्त्यांनी एकजुटीने कार्य करत आंतरराष्ट्रीय योग दिनाचा संदेश समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचविला.

यावेळी श्री. प्रितम जे. म्हात्रे यांनी समाजहित आणि जनकल्याणासाठी भविष्यातही अशा प्रकारचे आरोग्य, सामाजिक, शैक्षणिक आणि जनजागृतीपर उपक्रम सातत्याने आयोजित करण्याचा निर्धार व्यक्त केला. समाज आणि समुदायाच्या सर्वांगीण विकासासाठी जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था पुढेही विविध लोकहितकारी कार्यक्रम राबवत राहील, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमादरम्यान योग ही भारताने जगाला दिलेली अमूल्य देणगी असून भारतीय संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्यांचे प्रतीक असल्याचे सांगण्यात आले. समाजामध्ये आरोग्यदायी जीवनशैलीचा प्रसार व्हावा, योगाबाबत जनजागृती निर्माण व्हावी आणि 'निरोगी भारत' या संकल्पनेला अधिक बळ मिळावे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भारतीय जनता पार्टी, उलवे आणि जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था यांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थित नागरिकांनीही कार्यक्रमाचे कौतुक करत अशा आरोग्यवर्धक उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

"करू योग, राहू निरोग... हाच भारताचा नवा संकल्प!"

आयोजक :
भारतीय जनता पार्टी, उलवे
जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था

**"मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या दूरदृष्टीमुळे योगाला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आहे. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी शरीर, शांत मन आणि सुदृढ समाज घडविण्याचा प्रभावी मार्ग आहे. आज उलवेकरांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसाद हा निरोगी भारताच्या संकल्पनेला बळ देणारा असून समाजहितासाठी अशा लोकजागृतीपर उपक्रमांचे आयोजन सातत्याने केले जाईल."**

**— श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे**
**अध्यक्ष, जे. एम. म्हात्रे**
**चॅरिटेबल संस्था | भाजप नेते**

# ग्रामदैवत सटूआई माता मंदिराच्या जीर्णोद्धारानंतर मूर्ती प्राणप्रतिष्ठा व भव्य कलशारोहण सोहळा

**युवक आधार**
**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : निफाड शहरातील कादवा नदीकाठी, नक्षत्र वन परिसरात व वैनतेय विद्यालयाच्या मागील बाजूस वसलेल्या ग्रामदैवत मानल्या जाणाऱ्या प्राचीन श्री सटूआई माता मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम पूर्ण झाल्यानंतर मंदिरात भव्य कलशारोहण व मूर्ती प्रतिष्ठापना सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस चालणाऱ्या या धार्मिक उत्सवामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे या ऐतिहासिक व श्रद्धास्थान असलेल्या मंदिराला नवसंजीवनी मिळाली असून भाविकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. या निमित्ताने रविवार, दि. 21 जून 2026 रोजी सकाळी 8.30 वाजता श्री सटूआई माता मूर्ती व कलशाची भव्य ग्रामप्रदक्षिणा काढण्यात येणार आहे. त्यानंतर सकाळी 11 वाजता दुर्गा सप्तशती पठणाचा कार्यक्रम होणार



आहे.

सोमवार, दि. 22 जून 2026 रोजी विविध धार्मिक विधींसह श्री सटूआई माता मूर्ती प्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा संपन्न होणार आहे.

उत्सवानिमित्त आचार्य राहुल दिलीप कुलकर्णी व नाशिक येथील ब्रह्मवृंद यांच्या वेदघोषात गणेश पूजन, देवप्रतिष्ठा, होम-हवन, पूजाविधी तसेच कलश मिरवणूक आदी धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत.

वैष्णव भूषण ह.भ.प. सुजितजी महाराज देवरगावकर यांच्या शुभहस्ते मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात येणार असून महंत गणेशगिरीजी महाराज (निफाड) तसेच गुरुमाऊली महंत दिगंबरगिरीजी महाराज (अण्णाबाबा) यांच्या शुभहस्ते कलशारोहण सोहळा संपन्न होणार आहे.

याच दिवशी सायंकाळी 5 ते रात्री 8 वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून निफाड व परिसरातील हजारो भाविक या धार्मिक सोहळ्यात सहभागी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सटूआई माता मंदिर हे निफाडकरांचे श्रद्धास्थान असून मंदिराच्या जीर्णोद्धारामुळे धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमांना अधिक चालना मिळणार आहे. सटूआई मातेच्या कृपेने सर्वांच्या जीवनात सुख, शांती, आरोग्य व समृद्धी नांदो, अशी प्रार्थना यावेळी करण्यात येणार आहे.

या पवित्र व ऐतिहासिक धार्मिक सोहळ्यात निफाड शहर व परिसरातील सर्व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन श्री सटूआई मातेचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने सुभाष कर्डीले यांनी केले आहे.

# पवनी येथील प्राचीन बौद्ध स्तूपाला खासदार प्रशांत पडोळे यांची भेट

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा** : पवनी येथील जगन्नाथ टेकडी स्तूप हा महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील पवनी येथे वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेला अतिप्राचीन आणि ऐतिहासिक बौद्ध स्तूप आहे. हा स्तूप सम्राट अशोक यांच्या काळातील (इ.स.पूर्व ४थे–३रे शतक) बौद्ध संस्कृतीचे महत्त्वाचे केंद्र मानला जातो. सुमारे ३८ ते ४१ मीटर व्यासाचा हा स्तूप भाजलेल्या विटांनी बांधलेला असून, त्याभोवती प्रदक्षिणापथ आणि सांची-भारहूत शैलीतील दगडी कठडे असल्याचे पुरातत्त्वीय पुराव्यांतून स्पष्ट झाले आहे. उत्खननात मौर्य, शुंग आणि सातवाहन काळातील नाणी, मातीची भांडी तसेच ब्राह्मी लिपीतील शिलालेख आढळले आहेत.

अलीकडेच भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघाचे खासदार







प्रशांत पडोळे यांनी या स्तूपाला भेट देऊन संपूर्ण परिसराची पाहणी केली. यावेळी मा.असित बागडे आणि मार्शल प्रफुल रामटेके यांनी स्तूपावरील स्तंभांवरील धम्मलिपीचे वाचन करून त्याचा ऐतिहासिक संदर्भ उपस्थितांना समजावून सांगितला.

आणि मा.असित बागडे यांनी स्तूपाचे महत्व सांगितले.. भेटीदरम्यान खासदार प्रशांत पडोळे यांनी या ऐतिहासिक बौद्ध स्तूपाच्या पुढील उत्खनन व संवर्धनासाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील आणि त्यासंदर्भातील आवश्यक प्रक्रिया सुरू करण्यात येईल, असे आश्वासन कार्यकर्त्यांना दिले. या प्रसंगी मनोहर मेश्राम, हरीश तलमले, अरविंद अंबादे, नरेंद्र रामटेके, मनोज शेंडे, लियाकत अली, वसीम शेख, लेखराम मेंढे, अरविंद धारगावे, तसेच पवनी परिसरातील अनेक कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

**उत्खनन व संवर्धनासाठी केंद्र सरकारकडून निधी उपलब्ध करून देऊ - खासदार प्रशांत पडोळे**
**पवनी येथील प्राचीन बौद्ध स्तुपला दिली भेट**

# ICT कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी -** ICT कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट, मुरमाडी/सावरी येथे पेन्शन भवनात दिनांक १८ जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजेपासून ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सांस्कृतिक व कौशल्य विकासाचा संगम ठरलेल्या या कार्यक्रमाला विद्यार्थी, पालक व मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे उद्घाटन तसेच अध्यक्षस्थान अंगेश बेहलपाडे यांनी भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून सतीश भोवते, सागर साखरे आणि आशिष उके उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी ICT संगणक संस्थेचे संचालक शुभम रंगारी यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, ICT कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट ही केवळ संगणक शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारे ज्ञानमंदिर आहे. आधुनिक युगातील गरजा लक्षात घेऊन येथे कौशल्य विकासावर विशेष भर दिला जात असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यामुळे अनेक विद्यार्थी व पालक संस्थेच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त करीत आहेत.अध्यक्षीय मार्गदर्शनात अंगेश बेहलपाडे यांनी संगणक शिक्षणाचे वाढते महत्त्व, कौशल्याधारित शिक्षणाची गरज आणि विद्यार्थ्यांनी सातत्याने नवनवीन तंत्रज्ञान




आत्मसात करण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाने विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली.यावेळी विद्यार्थ्यांनी नृत्य, भाषण, विविध खेळ आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आकर्षक सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. विविध स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. तसेच मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन आरोही कांबळे व संस्कृती वासनिक यांनी केले. तर सेजल खापेकर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली.

# आसमी मेटल प्रॉडक्ट मुळे "प्रदूषण, वाहतूक धोका आणि विद्युत सुरक्षा प्रश्नांकित

## सुरक्षेचा गंभीर प्रश्न; औद्योगिक नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आरोप

**दैनिक युवक आधार**

**खालापूर | वार्ताहर - साबीर शेख** : खालापूर तालुक्यातील इसांबे ग्रामपंचायत हद्दीत रस्त्यालगत कार्यरत असलेल्या आसामी मेटल प्रोडक्ट या औद्योगिक युनिटमुळे परिसरात प्रदूषण आणि सुरक्षेचे गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. स्टील उत्पादन प्रक्रियेदरम्यान निर्माण होणारी धूळ, धूर आणि सार्वजनिक रस्त्यावरच सुरू असलेले लोडिंग-अनलोडिंग यामुळे नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आल्याची तक्रार करण्यात आली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, उत्पादन प्रक्रियेतून मोठ्या प्रमाणात धातूजन्य कण हवेत मिसळत असून त्यामुळे श्वसनविकार, डोळ्यांची जळजळ, त्वचारोग यांसारख्या आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, उत्पादनासाठी वापरला जाणारा





लोखंडी स्टँड सार्वजनिक रस्त्यावर ठेवण्यात आल्याने मालाची चढ-उतार प्रक्रिया वाहतुकीच्या मध्यभागीच केली जाते. यामुळे वाहनचालक आणि पादचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याशिवाय कंपनीने उभारलेल्या लोखंडी शेडच्या अगदी जवळ विद्युत प्रवाहाची यंत्रणा असल्याने वादळी वारे किंवा पावसाच्या काळात लोखंडी संरचना विद्युत प्रवाहाच्या संपर्कात आल्यास मोठी दुर्घटना घडू शकते, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे. यामुळे संबंधित परवानग्या आणि सुरक्षाविषयक मानकांबाबतही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या संदर्भात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे सचिव साबीर शेख यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB), फॅक्टरी निरीक्षक, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच महावितरण विभागाने तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून सखोल चौकशी करावी, अशी मागणी केली आहे.

संबंधित उद्योगाकडे प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा कार्यरत आहेत का, पर्यावरणीय व औद्योगिक सुरक्षा नियमांचे पालन केले जाते का, तसेच सर्व आवश्यक परवानग्या वैध आहेत का, याची तपासणी करण्याची मागणी सुरक्षिततेच्या दृष्टीने स्थानिक नागरिकांनी केली आहे. यावेळी कंपनी व्यवस्थापनास मानवीय भावनेतून सूचना केली असता स्थानिक बड्या नेत्यांच्या नाव पुढे करण्यात येत आहे .अर्थकारण व आरोग्य,सुरक्षितता पाहता बेजबाबदार उद्योग व्यवसायिकांनी नियम,मर्यादा न पाळल्यास भविष्यात मोठी किंमत चुकवावी लागेल असा सवाल या निमित्ताने उपस्थित होत आहे.या विषयी नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित उद्योगाविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच आवश्यक असल्यास उद्योगाचे स्थलांतर करण्याचाही विचार करावा, अशी भूमिका नागरिकांनी मांडली आहे. परिसरातील इतर प्रदूषणाशी संबंधित उद्योगांचीदेखील चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

"औद्योगिक विकास महत्त्वाचा असला तरी तो नागरिकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या किंमतीवर होऊ नये. प्रदूषणमुक्त आणि सुरक्षित वातावरण हा नागरिकांचा मूलभूत हक्क आहे," अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# ठाण्यात 12 वा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

## आ. निरंजन डावखरे, उपमहापौर कृष्णा पाटील आणि जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**

**कल्याण प्रतिनिधी** : भारतीय संस्कृतीची ५००० वर्षांची प्राचीन आणि अमूल्य देणगी असलेला 'आंतरराष्ट्रीय योग दिन' आज २१ जून रोजी ठाण्यात अत्यंत उत्साहात आणि भव्य स्वरूपात संपन्न झाला. महाराष्ट्र शासन आणि भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आलेल्या या १२ व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त ठाणेकरांनी आरोग्याचा नवा संकल्प सोडत मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली. व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकासासाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या या दिनाचे औचित्य साधून संपूर्ण जिल्ह्यात विविध उपक्रम राबवण्यात आले.






या योग दिनाचा मुख्य शासकीय कार्यक्रम ठाणे (कोपरी) येथील तालुका क्रीडा संकुलात सकाळी ठीक ७.०० वाजता पार पडला. जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाने पतंजली योग समिती, प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय आणि इतर नामांकित योग संस्थांच्या सहकार्याने या भव्य योग शिबिराचे आयोजन केले होते.

या दिमाखदार सोहळ्याला कोकण पदवीधर मतदारसंघाचे आमदार निरंजन डावखरे, ठाणे महानगरपालिकेचे उपमहापौर कृष्णा दादू पाटील, जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के या मान्यवरांसह दाक्षम जिमनॅस्टिक अकादमी, जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्र, अश्वमेध वेटलिफ्टिंग प्रशिक्षण केंद्रातील खेळाडू व त्यांचे पालक, प्रशिक्षक, क्रीडा मार्गदर्शक, विविध शासकीय कार्यालयांचे अधिकारी व कर्मचारी तसेच योगप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. या कार्यक्रमादरम्यान श्रीमती रंजना तिवारी, पतंजली योग समिती तसेच श्री. विजय मढेकर, ठाणे स्कूल ऑफ योगा यांच्या मार्गदर्शनाखाली आयुष मंत्रालयाने निर्धारित केलेल्या Common Yoga Protocol नुसार विविध योगासने, प्राणायाम व ध्यान सत्राचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी योगाचे महत्त्व, निरोगी व तणावरहित जीवनशैलीसाठी नियमित योगाभ्यासाची आवश्यकता तसेच शारीरिक व मानसिक आरोग्य संवर्धनामध्ये योगाचे योगदान याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी उपस्थित सर्व लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी आणि नागरिकांनी योग मार्गदर्शकांच्या सूचनेनुसार विविध योगासने, प्राणायाम आणि ध्यान साधनेचा सराव केला.

स्वतः आमदार डावखरे आणि जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी सर्वसामान्य नागरिकांच्या सोबतीने योगाभ्यास करत आरोग्याचा संदेश दिला.

या मुख्य सोहळ्यासोबतच ठाणे जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालये, शैक्षणिक संस्था, शासकीय कार्यालये, औद्योगिक प्रतिष्ठाने, क्रीडा व युवक मंडळे तसेच सामाजिक संस्थांच्या वतीने मोठ्या प्रमाणात योग जनजागृती अभियान राबविण्यात आले.

उपस्थितांनी नियमित योगाभ्यास करण्याचा तसेच निरोगी व सुदृढ जीवनशैलीचा संदेश समाजामध्ये प्रसारित करण्याचा संकल्प केला.

कार्यक्रमाचे नियोजन व समन्वय जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे यांनी विविध योग संस्था, क्रीडा प्रशिक्षण केंद्रे व स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने यशस्वीरित्या केले.

जिल्हा प्रशासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत ठाणेकरांनी दाखवलेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आजचा योग दिन सोहळा खऱ्या अर्थाने यशस्वी ठरला.

## सलील काळे यांच्या तक्रारीची दखल; ठाणेदार गिरीश ताथोड यांच्याविरुद्ध चौकशी चा आदेश

**दैनिक युवक आधार**

**सचिन ठाकूर प्रतिनिधी धामणगाव रेल्वे** : धामणगाव रेल्वे येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार सलील सच्चिदानंद काळे यांनी दत्तापूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार गिरीश ताथोड यांच्याविरोधात दाखल केलेल्या तक्रारीची विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण, अमरावती विभागाने गांभीर्याने दखल घेतली आहे. तक्रारीची प्राथमिक तपासणी पूर्ण झाल्यानंतर सदर प्रकरण चौकशीस पात्र असल्याचे मत प्राधिकरणाने नोंदविले असून तक्रारीची अधिकृतपणे नोंद करून पुढील चौकशी सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्राधिकरणाने नुकत्याच दिलेल्या आदेशात नमूद केले आहे की, तक्रारदाराने मांडलेल्या बाबी प्राधिकरणाच्या विनियमान्वये योग्य व दखलपात्र असून




त्या प्राधिकरणाच्या अधिकारक्षेत्रात येतात. त्यामुळे संबंधित तक्रार नोंदवून तिला नवीन क्रमांक देण्यात यावा तसेच जाबदेय पोलीस अधिकारी म्हणून ठाणेदार गिरीश ताथोड यांच्याविरोधात प्रकरणाची नोंद करण्यात यावी, असे सदरहू आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरणाच्या अध्यक्ष तथा सेवानिवृत्त प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश उषा सुरेश ठाकरे तसेच सदस्य पी. टी. उपाख्य बाजीराव पाटील, सेवानिवृत्त पोलीस अधीक्षक आणि सन्माननीय नागरी प्रतिनिधी पंकज निखार यांच्या संयुक्त स्वाक्षऱ्यांसह सदरहू आदेश पारित करण्यात आला आहे. प्राधिकरणाच्या या निर्णयामुळे दत्तापूर (धामणगाव) चे ठाणेदार गिरीश ताथोड यांचे विरूध्द दाखल केलेल्या तक्रारीच्या चौकशी प्रक्रियेला अधिकृत सुरुवात झाली असून संबंधितांकडून आवश्यक कागदपत्रे व स्पष्टीकरण मागविले जाण्याची शक्यता आहे.

दरम्यान, या प्रकरणातील चौकशी अहवाल आणि पुढील कारवाई कडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले असून चौकशीतून संपुर्ण वस्तुस्थिती समोर येणार आहे.

## तळा भारतीय स्टेट बँकेत शाखा प्रबंधकाची तसेच कंत्राटी कर्मचाऱ्यांची ग्राहकांबरोबर दादागिरी

**दैनिक युवक आधार**

**तळा / नितीन लोखंडे :** तळा येथील भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कोड 15974 या शाखेमध्ये नवनियुक्त शाखा प्रबंधक तसेच कंत्राटी कर्मचारी बँकेमध्ये आलेल्या ग्राहकांबरोबर उद्धटपणे वागून ग्राहकांनी बँक खात्याशी संबंधित प्रश्न विचारले असता अशिक्षित महिला, वृद्धांना उद्धटपणे उत्तर देणे, ग्राहकांना ताटकळत उभे ठेवणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांवर चिडणे, ग्राहकांना रागाने उत्तर देणे असा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. बँक कर्मचारी ग्राहकांना सेवा पुरवण्यासाठी असून बँक म्हणजे माझी मालकी अशा रुबाबात अधिकारी, कर्मचारी, कंत्राटी कर्मचारी यांनी न राहता ग्राहकांना योग्य माहिती देणे त्यांना मदत करून सहकार्य करणे. तळा शाखा प्रबंधक




हा बँकेचा जबाबदार कर्मचारी असून खातेदारांचे न ऐकता कंत्राटी कर्मचारी मुलींकडून झालेल्या चुकीचे समर्थन करणे त्यांना पाठबळ देणे, ग्राहकांपेक्षा माझा कर्मचारी माझ्यासाठी सर्वश्रेष्ठ असे बोलणे, ग्राहकांना गुन्हे दाखल करण्याची भीती दाखवणे बँकेचे आर्थिक नुकसान करणे बँक अधिकाऱ्याला अशोभनीय आहे. त्यामुळे ग्राहकांबरोबर उद्धटपणे वागणाऱ्या तळा स्टेट बँक ऑफ इंडिया मधील कंत्राटी कर्मचारी तसेच शाखा प्रबंधकाला सेवेतून बडतर्फ करून कारवाई करण्याची मागणी होत आहे. तालुक्यातील बँकेचे ग्राहक खेड्यापाड्यातून वेळ पैसा खर्च करून बँकेत पैसे काढण्यासाठी पैसे भरण्यासाठी, पासबुक एन्ट्री असे अनेक प्रश्न घेऊन येत असतात. यामध्ये वयोवृद्ध महिला पुरुष तसेच स्त्रिया अशिक्षित आदिवासी महिला लाडक्या बहिणी यांना पैसे भरणे पैसे काढणे केवायसी याविषयीची माहिती नसल्यामुळे त्यांना बँकेमध्ये योग्य मदत मिळत नसल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे स्टेट बँकेने आलेल्या ग्राहकांना मदत करण्यासाठी बँकेचा अधिकृत मदत कक्ष अधिकारी नियुक्त करावा जेणेकरून ग्राहकांशी आदराने बोलून ग्राहकांना योग्य माहिती मिळाल्यामुळे ग्राहकांचा पैसे आणि वेळ वाचून ग्राहकांना दिलासा मिळेल.

## जिल्हा प्रशासनाच्या ‘ई–भूमिती’ प्रकल्पाला प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कार ; जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : अकोला जिल्हा प्रशासनाच्या नाविन्यपूर्ण "ई-भूमिती – मॅपिंग एव्हरी इंच ऑफ गव्हर्नन्स" या प्रकल्पाला देशातील प्रतिष्ठित स्कॉच पुरस्कार प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील पीएचडी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, ऑगस्ट क्रांती मार्ग येथे आयोजित 108 व्या स्कॉच समिटमध्ये हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा मीना यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

स्कॉच पुरस्कार हा भारतातील प्रशासन, सुशासन, डिजिटल परिवर्तन, सामाजिक विकास, वित्तीय समावेशन आणि सार्वजनिक सेवा क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेणारा एक मानाचा राष्ट्रीय पुरस्कार मानला जातो. देशभरातील विविध शासकीय संस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम



आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांमधून उत्कृष्ट उपक्रमांची निवड करून त्यांना हा सन्मान प्रदान केला जातो. त्यामुळे या पुरस्कारामुळे अकोला जिल्ह्याच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली गेली आहे.

ई-भूमिती हा जिल्ह्यातील विविध शासकीय मालमत्ता, सुविधा व सेवांचे भू-स्थानिक जीआयएस तंत्रज्ञानाद्वारे एकत्रित डिजिटल मॅपिंग करणारा अभिनव प्रकल्प आहे. या प्रणालीमध्ये शाळा, अंगणवाडी केंद्रे, रेशन दुकाने, आरोग्य संस्था, जलस्रोत, डिजिटल सेवा केंद्रे, शासकीय कार्यालये तसेच विविध सार्वजनिक सुविधांची अचूक भौगोलिक माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे प्रशासनाला विकासकामांचे नियोजन, संसाधनांचे व्यवस्थापन, सेवा वितरण आणि निर्णय प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविणे शक्य झाले आहे.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या मार्गदर्शनाखाली विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पाने जिल्हा प्रशासनात डेटा-आधारित निर्णय प्रक्रियेला चालना दिली असून पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी करण्यासाठी तसेच नागरिकांना उत्तम सेवा उपलब्ध करून देण्यासाठी हा प्रकल्प उपयुक्त ठरत आहे. या राष्ट्रीय सन्मानाबद्दल जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी प्रकल्पाशी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि तांत्रिक चमूचे अभिनंदन केले असून हा पुरस्कार संपूर्ण अकोला जिल्ह्याच्या सामूहिक प्रयत्नांचा गौरव असल्याचे सांगितले.

## पालखेड विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : महाराष्ट्र शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थी आणि शिक्षकांनी विविध योगासने व प्राणायामाचे प्रात्यक्षिक सादर करून योगाचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक अशोक शेळके होते. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, आजच्या धावपळीच्या, चंगळवादी आणि भोगवादी जीवनशैलीमुळे माणसाचे शारीरिक व मानसिक आरोग्य विविध समस्यांना सामोरे जात आहे. त्यामुळे तणाव, चिडचिड आणि





अस्वस्थता वाढत असून त्याचा परिणाम दैनंदिन जीवनावर व प्रगतीवर होत आहे. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी योग अत्यंत उपयुक्त असून तो भारतीय संस्कृतीने जगाला दिलेला अमूल्य वारसा आहे. समाजाने नियमित योगाभ्यास करून शारीरिक व मानसिक संतुलन राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी ताडासन, वृक्षासन, त्रिकोणासन, वीरभद्रासन, सुखासन, वज्रासन, पश्चिमोत्तानासन, अर्धमत्स्येंद्रासन, भुजंगासन, धनुरासन आणि सेतूबंधासन यांसह विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत योग दिनाचा संदेश प्रभावीपणे दिला.कार्यक्रमास मुख्याध्यापक अशोक शेळके यांच्यासह निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्दवळे, संजय लव्हंगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव, राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावंत जाधव, संजय कोकतरे, ज्ञानेश्वर मातेरे, कविता ढोमसे, सारिका पवळे, सुरेश गांगुर्डे, रामदास पवार, नदीम तांबोळी आदी शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धर्माबादमध्ये शिवसैनिकांचा संताप ; पक्ष सोडलेल्या सहा खासदारांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सूर्यकार** : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या तिकिटावर निवडून आल्यानंतर पक्ष सोडून इतर पक्षात प्रवेश केलेल्या सहा खासदारांविरोधात धर्माबाद येथील शिवसैनिकांनी तीव्र संताप व्यक्त केला. शहरातील प्रमुख पानसरे चौक येथे एकत्र येत शिवसैनिकांनी संबंधित खासदारांच्या प्रतिमांना जोडे मारून निषेध नोंदविला तसेच त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन केले.निषेध आंदोलनादरम्यान खासदार नागेश पाटील आष्टीकर, संजय दिना पाटील, संजय जाधव, ओमराजे निंबाळकर, संजय देशमुख आणि राजाभाऊ वाघचौरे यांच्या प्रतिमांचे प्रदर्शन करण्यात आले. यावेळी शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी करत पक्षाशी एकनिष्ठ राहण्याचा संदेश दिला.“गद्दार खासदारांचे करायचे काय, खाली मुंडके वर पाय”, “शिवसेना अंगार है, बाकी सब भंगार है”, “जय भवानी, जय शिवाजी”, “शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा विजय असो” अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. आंदोलनाची सुरुवात संबंधित खासदारांच्या




प्रतिमांना जोडे मारून करण्यात आली. त्यानंतर त्यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करून निषेध व्यक्त करण्यात आला.आंदोलनादरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.या आंदोलनात तालुकाप्रमुख मारोती पाटील कागेरू, उपजिल्हाप्रमुख गणेश गिरी, शहरप्रमुख बालाजी बनसोडे, विधानसभा प्रमुख शिवराज पाटील मोकलिकर, शहर संघटक राजू शिरामणे, मनसे तालुकाध्यक्ष दत्तात्रय कावडे, ज्येष्ठ शिवसैनिक गणपत कात्रे, प्रविण जमादार, पांडुरंग पांचाळ, गणेश दुदुलवाड, अशोक रामोड, वीरभद्र वारले यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

## थेरोंडा गावच्या शाळेसाठी अनिल कालेकर यांची अनोखी भेट; विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : मराठी शाळेप्रती जिव्हाळा जपला, वाढदिवसाचा समाजोपयोगी साज, वाढदिवसानिमित्त शाळेला दिली मोलाची भेट.आजच्या काळात वाढदिवस म्हणजे केक कापणे, फटाके फोडणे किंवा मोठ्या प्रमाणावर खर्च करणे, अशीच सर्वसाधारण धारणा झाली आहे. मात्र समाजासाठी काहीतरी देण्याची भावना जपणारे व्यक्तिमत्त्व अजूनही आपल्या समाजात आहेत, याची प्रचिती अलिबाग तालुक्यातील थेरोंडा येथे आली. सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत श्री. अनिल कालेकर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त थेरोंडा येथील मराठी प्राथमिक शाळा क्रमांक १ ला ५०० लिटर क्षमतेची पिण्याच्या पाण्याची टाकी भेट देऊन विद्यार्थ्यांसाठी मोलाचे योगदान दिले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुरेखा द्यानदेव खंडारे यांच्या विनंतीनुसार ही टाकी शाळेला देण्यात आली.

गावातील शाळा ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसून गावाच्या संस्कृतीचे, परंपरेचे आणि सामाजिक जडणघडणीचे मंदिर असते. अनेक यशस्वी अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, अभियंते आणि उद्योजक यांची पायाभरणी अशाच ग्रामीण मराठी शाळांमध्ये झाली आहे. मात्र बदलत्या काळात इंग्रजी शाळांच्या वाढत्या आकर्षणामुळे अनेक मराठी शाळा विद्यार्थीसंख्येअभावी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत गावातील




शाळांना स्थानिक नागरिक, माजी विद्यार्थी आणि समाजातील दानशूर व्यक्तींनी मदतीचा हात देणे ही काळाची गरज बनली आहे.श्री. अनिल कालेकर यांनी केलेली ही मदत केवळ पाण्याची टाकी देण्यापुरती मर्यादित नसून गावातील शाळांविषयी असलेली आपुलकी, जिव्हाळा आणि सामाजिक जबाबदारी अधोरेखित करणारी आहे. उन्हाळा असो वा पावसाळा, विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी ही टाकी उपयुक्त ठरणार आहे.या प्रसंगी ग्रामस्थांनीही कालेकर यांच्या उपक्रमाचे कौतुक करत इतरांनीही वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा इतर आनंदाचे क्षण सामाजिक उपक्रमांद्वारे साजरे करण्याचा आदर्श घ्यावा, असे मत व्यक्त केले.आज गरज आहे ती आपल्या गावातील मराठी शाळांकडे पुन्हा प्रेमाने आणि अभिमानाने पाहण्याची. आपल्या मुलांना संस्कार, संस्कृती आणि मातृभाषेचे शिक्षण देणाऱ्या या शाळा टिकल्या तरच गावाची ओळख टिकून राहणार आहे. गावातील प्रत्येक नागरिकाने आपल्या शाळेशी नाते जोडून तिच्या विकासासाठी हातभार लावला, तर मराठी शाळांचे भवितव्य अधिक उज्ज्वल होईल."गावची शाळा हीच गावाची शान; तिचे संवर्धन हीच खरी समाजसेवा" हा संदेश श्री. अनिल कालेकर यांच्या या उपक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाला आहे.

# ग्रामीण विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी ‘माइंडसेट अकॅडमी काटोल’ची स्थापना

## गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी नवे शैक्षणिक व्यासपीठ

**दैनिक युवक आधार**

**बीरायगड रणिता ठाकूर** : ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, योग्य मार्गदर्शन आणि स्पर्धात्मक वातावरण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने नागपूर जिल्ह्यातील काटोल येथे ‘माइंडसेट अकॅडमी काटोल’ या शैक्षणिक संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, बौद्धिक आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना देणारे हे एक अभिनव शैक्षणिक व्यासपीठ ठरत आहे.

आजच्या तीव्र स्पर्धेच्या युगात ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, अनुभवी शिक्षक आणि योग्य मार्गदर्शनाच्या अभावामुळे आपल्या क्षमतांना न्याय देता येत नाही. ही गरज ओळखून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी माइंडसेट अकॅडमीची सुरुवात करण्यात आली आहे.

संस्थेमध्ये पोलीस भरती, तलाठी, वनरक्षक, एमपीएससी, जिल्हा परिषद तसेच विविध स्पर्धा परीक्षांसाठी विशेष प्रशिक्षण दिले जाते. याशिवाय इयत्ता ५ वी ते ९ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र ट्यूशन वर्ग सुरू करण्यात आले असून प्रत्येक विषयासाठी अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

स्पर्धा परीक्षा विभागात इंग्रजी



व्याकरणासाठी रजत सरोदे सर, इंग्रजी विषयासाठी ललिता कोकोडे मॅडम, मराठी व्याकरण व सामान्य ज्ञानासाठी मयूर साठोणे सर, विज्ञानासाठी कपिल ठाकरे सर, गणित व बुद्धिमत्तेसाठी राहुल ठाकरे सर आणि भाग्यश्री हजारे मॅडम मार्गदर्शन करीत आहेत. तर शालेय विभागात इंग्रजी व विज्ञानासाठी वंशिका सोमकुवर मॅडम तसेच गणितासाठी वैदही देशभ्रतार मॅडम अध्यापनाची जबाबदारी सांभाळत आहेत. संस्थेच्या नियोजन अधिकाऱ्याची धुरा लीना साठोणे मॅडम सांभाळत आहेत.

संस्थेचे ध्येय केवळ विद्यार्थ्यांना परीक्षेत यश मिळवून देणे नसून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, प्रभावी संवाद कौशल्य, सकारात्मक विचारसरणी आणि सामाजिक जाणीव विकसित करणे हे आहे. यासाठी नियमित अभ्यासासोबत स्टेज डेअरिंग, सार्वजनिक वक्तृत्व, व्यक्तिमत्त्व विकास, डिजिटल नॉलेज आणि विविध प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते.

"प्रत्येक गावातील विद्यार्थी हा उद्याचा अधिकारी व्हावा" या प्रेरणादायी विचारातून संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. अत्यल्प शुल्कात दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा संस्थेचा प्रयत्न आहे.

काळाची गरज ओळखून संस्थेने आधुनिक तंत्रज्ञानाचाही स्वीकार केला आहे. विद्यार्थ्यांना घरबसल्या शिक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी Mindset Academy Katol हे मोबाईल ॲप तसेच अधिकृत वेबसाईट विकसित करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्रातील विविध ग्रामीण भागातील विद्यार्थी संस्थेशी जोडले जाऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा लाभ घेऊ शकतील.

संस्थेचे संस्थापक व संचालक मा. मयूर मारोतराव साठोणे हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या अडचणी जवळून अनुभवलेले युवक असून समाजाप्रती असलेल्या बांधिलकीतून त्यांनी ही शैक्षणिक चळवळ उभी केली आहे. विद्यार्थ्यांच्या यशामध्येच समाजाचा विकास दडलेला आहे, या विश्वासातून ते सातत्याने कार्यरत आहेत.

ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी, स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी माइंडसेट अकॅडमी काटोल हे एक विश्वासार्ह व सक्षम व्यासपीठ म्हणून उदयास येत आहे.

अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी एक पाऊल पुढे टाकावे, असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

संपर्क : नाकाडे हॉस्पिटल मागे, शनिचौक, काटोल, जि. नागपूर मोबाईल : 9657432254 / 9309430144. Play Store App : Mindset Academy Katol.

---

# राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त पनवेल काँग्रेस व पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस तर्फे वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 19 जून रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पनवेल काँग्रेस व पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत भव्य वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. या उपक्रमाद्वारे पर्यावरण संरक्षण, हरित विकास आणि निसर्ग संवर्धनाचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. वाढत्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज असल्याचे उपस्थित मान्यवरांनी यावेळी सांगितले.

या कार्यक्रमास माजी जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील, विधी सेलचे जिल्हाध्यक्ष के. एस. पाटील, नगरसेविका लीला कातकरी,



नगरसेवक लतीफ शेख, नगरसेवक जनार्दन पाटील, महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, युवक जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, पर्यावरण सेलचे जिल्हाध्यक्ष सुरेश पाटील, इशिका सुधीजा, खांदा शहराध्यक्ष जयवंत देशमुख, सुधीर मोरे, पर्यावरण सेलचे रायगड जिल्हाध्यक्ष राजू पाटील, महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे सचिव विश्वजीत पाटील, प्रशांत पारवे, महाराष्ट्र प्रदेश सोशल मीडिया उपाध्यक्ष अभिजित पाटील, मेघनाथ पाटील, समीर पठाण, रवी राजीवडे, शाहीद मुल्ला, राज पाटील, सुजित पाटील, नीता शेनॉय, गुलजार म्हात्रे, मनोज बिराजदार, कामोठे शहराध्यक्ष जयेश लोखंडे, पनवेल शहराध्यक्ष डॉ. अमित दवे, सुनंदा घरत, उत्तम पाटील, प्रदीप बरगल, विलास म्हात्रे यांच्यासह पनवेल काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी भविष्यातील सुजलाम-सुफलाम पर्यावरणासाठी आणि निसर्गाच्या रक्षणासाठी झाडे लावणे व ती जगवणे हाच खरा वाढदिवसाचा संकल्प आहे, असा निर्धार व्यक्त केला.

वृक्षारोपण उपक्रम पर्यावरण संवर्धनासाठी प्रेरणादायी ठरला असून भविष्यातही अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

---

# एक पृथ्वी, एक आरोग्य आणि एक भविष्य" या संकल्पनेला स्व . माणिक पोदार लर्न स्कूलच्या विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**रिसोड | प्रतिनिधी रणजितसिह. ठाकूर** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त स्व. माणिक पोदार लर्न स्कूल, वाढोणा येथे उत्साहपूर्ण आणि शिस्तबद्ध वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. "एक पृथ्वी, एक आरोग्य आणि एक भविष्य" या यंदाच्या संकल्पनेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सामूहिक योगाभ्यासातून निरोगी भारत घडविण्याचा संकल्प व्यक्त केला.

विद्यार्थ्यांमध्ये योगाविषयी जागरूकता निर्माण करणे, शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करणे तसेच निरोगी जीवनशैलीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविणे हा कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता. कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थना व योग दिनाच्या महत्त्वाविषयी मार्गदर्शनाने करण्यात आली.

यावेळी शिक्षकांनी योगाचे दैनंदिन जीवनातील महत्त्व, शारीरिक तंदुरुस्तीबरोबरच मानसिक स्वास्थ्य जपण्यात योगाची असलेली भूमिका आणि तणावमुक्त जीवनासाठी योगाचे योगदान याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली. योग ही केवळ व्यायाम पद्धती नसून निरोगी, संतुलित आणि आनंदी जीवन जगण्याची प्रभावी जीवनशैली असल्याचेही त्यांनी सांगितले.

यानंतर विद्यार्थ्यांनी ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, पद्मासन आदी विविध योगासने तसेच प्राणायाम व ध्यानधारणा यांचे प्रात्यक्षिक सादर केले. योग प्रशिक्षक व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी सामूहिक योगाभ्यास करून आरोग्य संवर्धनाचा संदेश दिला. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्त आणि सहभाग यामुळे संपूर्ण शाळा परिसर योगमय वातावरणाने भारावून गेला होता.

यावेळी शाळा व्यवस्थापनाने विद्यार्थ्यांना नियमित योगाभ्यास करण्याचे आवाहन केले. योगामुळे शरीर सुदृढ राहते, मन एकाग्र होते, आत्मविश्वास वाढतो आणि सकारात्मक विचारसरणी विकसित होते, असे प्रतिपादन करण्यात आले.

या कार्यक्रमास शाळेचे संचालक मंडळ, प्राचार्य, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

"निरोगी शरीर, शांत मन आणि सशक्त समाज घडविण्यासाठी योग हा प्रभावी मार्ग आहे," हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

---

# आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात उत्साहात योग दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग व क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमानाणे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना योग हा शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक शांतता व एकाग्रता वाढविण्यासाठी उपयुक्त असल्याचे सांगितले. योग प्रशिक्षक डॉ.प्रा.निलेश गाडेकर व प्रा.विनोद चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना विविध योगासने, सूर्यनमस्कार,प्राणायाम व ध्यानधारणेचे प्रात्यक्षिक करून घेतले.या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. नियमित योगाभ्यास करून निरोगी




जीवनशैली अंगीकारण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सुनील चौधरे यांनी केले तर आभार डॉ. निलेश गावडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे, डॉ.निलेश गावडे,डॉ.पंकज गावित व क्रीडा विभागाचे विभाग प्रमुख डॉ.निलेश गाडेकर,गजानन शिरसागर यांनी परिश्रम घेतले तसेच प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

---

# आष्टी गावातील वारंवार वीज खंडित ; नागरिक त्रस्त

**दैनिक युवक आधार**

**हदगाव प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : आष्टी गावामध्ये गेल्या तीन दिवसांपासून सतत वीज पुरवठा खंडित होत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या 33/11 के.व्ही. उपकेंद्रांतर्गत येणाऱ्या या भागात वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे दैनंदिन कामकाजावर परिणाम होत आहे.सततच्या वीज खंडितामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे निर्माण होत असून नागरिकांना पिण्याचे पाणी, शेती




व इतर आवश्यक कामांसाठी अडचणींचा सामना करावा लागत आहे. संबंधित विभागाने तात्काळ दखल घेऊन वीज पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

---

# वैशाली उर्फ लावण्या मडावी राज्यस्तरीय नृत्यांगना पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा -** गडचिरोली येथील वैशाली उर्फ लावण्या मडावी यांना राज्यस्तरीय नृत्यांगना अभिनव कला नृत्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर, नृत्यांगना,कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात त्यांच्या अभिनय



नृत्य कलेची कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

---

# नागपूर मध्यवर्ती कारागृहामध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : नागपूर मध्यवर्ती कारागृहाध्ये आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्् दिनांक 15.06.2026 ते दिनांक 21.06.2026 या कालावधीमध्ये नागपूर मध्यवर्ती कारागृह व आर्ट ऑफ लिव्हिंग व स्व्. रामदासजी दगडुजी बुंदे शिक्षण संस्था नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सात दिवसीय योग व ध्यानधारणा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

मा. श्री डॉ. सुहास वारके, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक ,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या प्रेरणेतुन व मा.श्री.योगेश देसाई, विशेष कारागृह महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य,पुणे व कारागृह अधीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर,श्री वैभव सु.आगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबीरामध्ये योगासने, प्राणायम, ध्यान, सुदर्शन क्रिया तसेच तणाव व्यवस्थापनाची विविध तंत्रे शिकवण्यात आली. योगाच्या माध्यमातून शारीरिक स्वास्थ्याबरोबरच मानसिक शांतता, भावनिक संतुलन आणि सकारात्म्क विचारसरणी विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला.

योगाची परंपरा हजारो वर्षे जुनी आहे. प्राचीन भारतीय ऋषी मुनी व योग परंपरेतुन आलेली आहे. योगाचे शारीरिक,मानसिक, आणि अध्यात्मिक फायदे लोकांपर्यत पोहोचावेत आणि निरोगी जीवनशैलीला प्रोत्साहन मिळावे म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

आजचे प्रमुख प्रशिक्षक श्री विनय सगदेव, जिल्हा समन्वयक, आर्ट ऑफ लिव्हिंग यांनी भारतीय संस्कृतीतील योगाच महत्व्नस सांगितले त्याचबरोबर योगामुळे शरीर निरोगी आणि सदृढ होते असे योगाचे अनेक फायदे मनोगत व्यक्त् करताना सांगितले.

सदरील शिबीरांमध्ये सहभागी होणाऱ्या बंद्यानी आपले मनोगत व्यक्त् करताना शारीरिक व्याधी कमी झाल्या व शांत झोप लागण्यास खूप मदत झाली त्याचबरोबर तणावातुन बाहेर पडण्यास खुप मदत होत आहे, सुदर्शन क्रिया दररोज केल्यामुळे मन प्रसन्् होते आणि संपुर्ण् दिवस त्याचा सकारात्म्क परिणाम जाणवतो असे मनोगत व्यक्् केले.

अध्यक्षीय भाषणामध्ये श्रीमती दिपा आगे , अति.अधीक्षक यांनी योग आपल्याला स्वतःशी संवाद साधायला शिकवतो. आपल्या चुका ओळखून त्यातून शिकण्याची आणि नव्याने उभे राहण्याची शक्ती देतो. प्रत्येक व्यक्तीमध्ये बदल घडवून आणण्याची क्षमता असते. योग त्या क्षमतेला योग्य दिशा देण्याचे कार्य करतो. आजचा दिवस केवळ योगासने करण्यापुरता मर्यादित नसून निरोगी आणि शिस्तबद्ध जीवन जगण्याचा संकल्प करण्याचा दिवस आहे. आपल्या प्राचीन



संस्कृतीने जगाला "वसुधैव कुटुंबकम्" आणि "सर्वे भवन्तु सुखिनः" हा संदेश दिला. योग हाच त्या संदेशाचा आधार आहे. योगामुळे मनातील नकारात्मकता दूर होते आणि शांतता, संयम, सहनशीलता व आत्मविश्वास वाढतो. मन हे शरीराची गुरुकिल्ली आहे. योगासनामुळे मन प्रसन्् राहते त्यामुळे आंतरीक ऊर्जा निर्माण होऊन सकारात्म्क बदल होण्यास मदत होते. प्रत्येक बंदयानी योगासाठी दररोज स्व्त:ला 20 मि. दयावी असे मार्गदर्शन केले .

सदरील योगाशिबीर पुरुष बंद्यासाठी आर्ट ऑफ लिव्हिंग चे श्री नवीन खानोरकर, मुख्् योगप्रशिक्षक, श्री सुनिल आमटे, योगप्रशिक्षक व महीला बंद्यासाठी स्व् . रामदासजी दगडुजी बुंदे शिक्षण संस्था नागपूर च्या श्रीमती सोनाली बुंदे, अध्यक्षा, श्रीमती रश्मी माटे, योगप्रशिक्षिका, सारीका जावळेकर, योगप्रशिक्षिका, श्रीमती नंदिनी कुमरे, योगप्रशिक्षिका, श्रीमती गुणगुण कारमोरे, योगप्रशिक्षिका व श्रीमती मयुरी टेंबरे पत्रकार ,सकाळ यांच्या उपस्थितीत पार पडले.

आंतरराष्ट्रीय योग दिवस श्री मंगेश चारडे, सिनीयर इव्हेंट एक्सिक्युटीव्ह लोकमत मिडीया , श्री प्रमोद पारधे, एक्सिक्युटीव्ह लोकमत मिडीया, श्री विनय सगदेव, जिल्हा समन्वयक, आर्ट ऑफ लिव्हिंग, श्री नवीन खानोलकर, योगप्रशिक्षक, आर्ट ऑफ लिव्हिंग व श्री सुनिल आमटे, योगप्रशिक्षक, आर्ट ऑफ लिव्हिंग नागपूर मध्यवर्ती कारागृह अधीक्षक श्री. वैभव सु. आगे , श्रीमती दिपा आगे , अति. अधीक्षक, श्री श्रीधर प.काळे, उपअधीक्षक यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. नागपूर मध्यवर्ती कारागृहातील सर्व कारागृह अधिकारी/ कर्मचारी व पुरुष व महिला बंदी मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच महिला विभागामध्ये महिला बंद्यांनी तारोको छुले तिरंगा या गाण्यावर विविध योगासने सादर केली.

आजचा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी श्री. मनोहर भोसले , वरिष्ठ तुरूंगाधिकारी , श्री, वामन निमजे , वरिष्ठ तुरूंगाधिकारी, श्री. बाळासाहेब शिंदे , वरिष्ठ तुरूंगाधिकारी,श्री. गणपत खोकले, शिक्षक ,श्री. मंगेश देशमुख ,शिक्षक , श्रीमती स्वाती भगत शिक्षिका , श्री. सुभाषचंद्र शाहु, शिपाई, श्रीमती निता पाटील, हवालदार यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन श्री मंगेश देशमुख, शिक्षक यांनी केले.